युगमनाचे स्पंद

# सर्व स्त्री-पुरुषांस खुले !

निवडणुकीच्या धामधुमीला सुरवात झाली आहे. मतदान, प्रचारसभा सगळ्याला यावेळी एक प्रकारची मरगळ आली आहेसे वाटत होते, पण आता वातावरण निर्माण व्हायला सुरवात झाली आहे.

भारतामध्ये घटनेने स्त्रिया आणि पुरुष दोघां-च्याही बाबतीत समानतेचे धोरण स्वीकारले आहे. जगातल्या लोकशाहीच्या जनकत्वाचा दावा करणाऱ्या आणि अधिभौतिक शास्त्रांनी कळस गाठल्याच्या वल्गना करणाऱ्या इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशांतही मतदानाचा अधि-कार प्राप्त होण्यासाठी स्त्रियांना झगडावे लागले. आपला हक्क भांडून मिळवावा लागला.

भारतातील स्त्रियांना स्वातंत्र्याबरोबरच हा हक्क प्राप्त झाला. विनासायास. कदाचित म्हणूनच भारतीय स्त्रियांना मतदानाच्या आपल्या हक्काची असायला हवी तेवढी जाणीव वा किंमत वाटत नसावी.

मतदानाच्या दुसऱ्या दिवशी पाठुंगळी घेऊन जाणाऱ्या एखाद्या आजीबाईंचा फोटो वर्त-मानपत्र प्रसिद्ध करतात आणि घटनेतल्या सर्व नागरिकांना जाती, धर्म, वंश, लिंग, भाषा भेदातीत मतदानाच्या हक्कांचा डांगोरा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पिटतात.

एकंदर स्त्रियांची वृत्ती मतदान करण्यामागे काय असते ?

ग्रामीण भागामध्ये काम करायला जाणारे कार्यकर्ते सांगतात की भारतीय लोकशाहीचे मतदान निदान ग्रामीण भागात तरी-वाडी, पाडा अशा वस्तींमधून पोलिस-पाटलांपुरते किंवा गावपुढाऱ्यांपुरते मर्यादित असते !

मतमोजणी करताना अशी गठ्ठा मतें लक्षात येतात.

शहरी भागात आणखी वेगळा प्रकार !

एक तर मतदान करणे हे नागरिकाचे कर्तव्य आहे वगैरे छापील घोषणांना फक्त सुशिक्षित-पणा प्रतिसाद देणारा असतो.

त्यामुळे मत द्यायला जावे लागतेच.

मतदानाच्या दिवशी शाळा-कॉलेजे, ऑफिसे सगळ्यांना सुटी असते. निवांतपणा असतो. उत्साही कार्यकर्ते वारंवार येऊन विहिणी-सारखा भाव देतात, चढवतात म्हणून काही जातात.

आणि घरातले म्हणजे नवरा, सासू, सासरा इत्यादींची परंपरा सांभाळत स्त्रियाही मत देऊन येतात !

असे फार क्वचित दिसते की नवरा-बायको एकमेकांत अगदी समोरासमोर नाही तरी जाता येता, पक्ष, राजकारण, सद्यःप्रवाह इत्यादींची चर्चा करतात आणि शेवटी आपल्या स्वतःशी विचार करून मत देण्याचे 'पवित्र' कर्तव्य बजावतात !

एक तर विचार वगैरे करून देण्यासारखी मत ही गोष्ट आहे असे मुळी आम्ही मानतच नाही.

राजकारण म्हणजे गलिच्छ खेळ असा समज करून घेऊन आम्ही एकदाचे मत देऊन पाच वर्षे बिनघोर झोप काढायला मोकळे होतो !

मत देणाराच जिथे उदासिन तिथे उमेदवार बेदरकार होणे सरसकट असावे यात नवल काय ?

स्त्री उमेदवार हा आपल्याकडे अभावाने आढळणारा प्रकार !

'देशाच्या पंतप्रधानपदी स्त्री असणारा जगातला दुसरा देश' वगैरे कितीही टिमकी वाजवली तरी तेवढीच.

स्त्री- क्रियाशील राजकारणात भाग घेणारी, आपला ठसा उमटवणारी, हवे ते करू शक-णारी असा उल्लेख फारसा कुणालाच रुचत नाही.

भारतीय संस्कृतीची हीच तर शोकांतिका आहे. आम्हाला स्त्री-मित्र सहकारी वा मार्ग-दर्शिका म्हणून उघड रुचत नाही.

स्त्रीने एक तर हंटरवालीची भूमिका घ्यावी वा एकदम पतिपरायण एकनिष्ठ वगैरे मोह करणीची भूमिका घ्यावी.

ते या संस्कृतीला, समाजाला चालेल. तिने सांभाळावे आणि मग काय हवे ते समाज आणि देशकार्य करावे, अशी वृत्ती बाळगणाऱ्यांना त्यांचा दृष्टिकोन विशाल म्हणून नावाजायला लागावे, यातच या संस्कृतीचा पोकळ वासा कळून येतो !

स्त्री उमेदवार निवडणूक लढवायला तयार होत नाहीत, त्यांना नॉमिनेट करावे लागत असाही एक 'आपण तरी याच्यापेक्षा आणखी काय करणार ?' मंडळींकडून दावा करण्यात येतो.

तो कितपत बरोबर आहे ?

उमेदवार म्हणून उभे रहाणे ही आपल्या दरिद्री देशातली श्रीमंती चैन आहे.

निवडून येण्यासाठी उभे रहाणे आणि तसे प्रयत्न करणे, ही आणखी पुढची उधळपट्टीची पायरी आहे.

पैशांचे आणि माणसांचे दोन्ही पाठबळ त्यासाठी असावे लागते. आणि पुरुषांच्या-पुरुष उमेदवारांच्या बाबतीत मनुष्यबळाचा, कार्यकर्त्यांच्या पाठबळाचा जो प्लस पॉइंट ठरतो, विजयाची खात्री देऊ शकणारा घटक ठरतो, नेमका तोच स्त्री उमेदवाराच्या बाबतीत मार खाणारा मुद्दा ठरण्याची शक्यता असते !

स्त्रीच्या चारित्र्याला आमच्या पुरातन प्रचंड वगैरे वारसा सांगणाऱ्या संस्कृतीने एवढे गौरवून, गोंजारून किंवा बाऊ करून ठेवले आहे की स्त्रीने मनोमन 'पडदानशीन' राहून लाच खाल्ली, चार भिंतीआड गावठी हातभट्टी चालवली तरी चालते, पण तिने बाहेर येऊन जाहीरपणे दारूड्या किंवा तसेच काही व्यंग असणाऱ्या नवऱ्याला टाकून दुसऱ्या कुणाबरोबर रहायचे ठरवले की ती बदचालीची झालीच !

◎ ◎

---

मुखपृष्ठ

ल. स. कडू, पुणे

---

साधना

# स्त्री-शक्ती जागरण

साने गुरुजींनी आपली एक आठवण नोंदवून ठेवली आहे. आठवण आहे मुंबईहून कोकणात बोटीने जात असतानाची. त्याच बोटीवर महर्षी अण्णासाहेब कर्वे होते. ते जपानकडील प्रवासाहून परतले होते. साने गुरुजींना ते म्हणाले, "मी जे कार्य मंदगतीने, अंशाअंशाने करीत आहे तेच कार्य केवढ्या विलक्षण गतीने आणि विशाल प्रमाणावर महात्मा गांधींच्या चळवळीने करून दाखवले !"

अण्णासाहेब कर्वे कोणते कार्य करू मागत होते ? अण्णासाहेब सुप्त स्त्रीशक्ती जागृत करण्याचा प्रयत्न करू मागत होते. वैधव्यामुळे ज्या बालिकांची शक्ती गंजत होती, दडपली जात होती किंवा सामाजिक आशय जिला लाभू शकत नव्हता ती शक्ती परिपूर्ण रीतीने उमलावी आणि सामाजिकतेत तिला कृतार्थता लाभावी, यासाठी ते तळमळीने धडपडत होते. समाजाच्या एका थरापर्यंत कसेबसे ते पोचू शकले होते. त्या थरापर्यंत पोचण्यात आणखी अडथळे येऊ नयेत म्हणून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बहिणीला त्यांना प्रवेश नाकारावा लागला होता !

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या हे ध्यानी आले होते की एक स्त्री सुबुद्ध होणे म्हणजे अवघे कुटुंब सुधारणे. पण व्यापक प्रमाणावर हे कार्य करायचे तर औपचारिक शिक्षणपद्धतीला कवटाळून बसून चालणार नाही. औपचारिक शिक्षणाचा लाभ त्या काळात बारा-पंधरा टक्क्यांनादेखील मिळत नव्हता.

अनौपचारिक शिक्षण प्रसंगानुरोधाने चालते, ते साधनावलंबी फारसे नसते. त्यात पाठांतरावर, वाचिकतेवर, स्मरणशक्तीवर भर नसतो, ते संस्काररूप असते, त्याने विचारजागृती होते. ढोबळ संवेदनांकडून सूक्ष्म संवेदनांकडे माणूस जातो. शेवटी संस्कार, म्हणजे संवेदना लखलखित करणे आणि विवेकाच्या मर्यादेत त्या राहतील असे पाहाणे.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य फार खडतर होते. महात्मा ज्योतीबा फुले यांनी सुरू केलेल्या प्रबोधनाची कक्षा त्यांनी वाढवली होती. ज्योतीबांच्या विचारात जी अनघड उपजत आक्रमकता होती ती कर्मवीर शिंदे यांच्या कार्यात नव्हती. महात्मा ज्योतीबा फुले यांचे कार्य सूर्यासारखे होते तर शिंद्यांचे कार्य चंद्रासारखे होते.

महात्मा गांधींच्या स्त्रीविषयक कार्याची कक्षा फारच विशाल होती, जात-धर्म-वंश-भाषा-देश इत्यादी सर्व सीमा पार करणारी ती होती. एका बाजूला वलीअम्मासारखी अनपढ तमिळ स्त्री, दुसऱ्या बाजूला गंगाबेनसारखी गुर्जर विधवा, तिसऱ्या बाजूला काव्य-कोकिळा सरोजिनी नायडू तर चौथ्या बाजूला भारताच्या सेवेत कृतार्थता अनुभवणाऱ्या मीराबेन आणि सरलादेवी यांच्यासारख्या परदेशी महिला ! दशदिशांचा स्पर्श करणारे गांधीजींचे कार्य होते आणि त्रिविध रूपांत ते अभिव्यक्त होत होते. त्यात विधायकता होती आणि औपचारिक शिक्षणाचा अभाव त्यात अंतरायरूप ठरत नव्हता. ह्या रचनात्मक कामातून आत्मप्रबोधन आणि सामाजिक प्रबोधन दोन्ही साधत होती. जाणिवा तरल आणि सक्रिय बनत होत्या. त्यातून त्रिविध संघर्षांना चालना मिळत होती. पहिला संघर्ष मानसिक दास्याशी, दुसरा आप्त–स्वकीयांच्या नाजूक धाग्यांनी निर्माण झालेल्या दास्याशी आणि तिसरा सामाजिक व परदास्याशी. गांधीजींनी चळवळींच्या मार्गाने स्त्रीशक्ती जागवली आणि निर्भयतादी दैवी गुणांचे अद्‌भुत लेणे स्त्रियांना दिले. समतेची जाणीव त्यांनी निर्माण केली व तशी शक्ती दिली.

विनोबा आणि गांधी यांच्या स्त्रीशक्तीबाबतच्या कल्पना वेगळ्या आहेत. विनोबांना स्त्री शंकराचार्यांच्या पदवीला पोचावी अशी आकांक्षा आहे आणि म्हणून ब्रह्मविद्या मंदिराची त्यांनी स्थापना केली आहे. महात्मा गांधींना भंग्याची मुलगी राष्ट्राध्यक्षपदी बसण्याला पात्र ठरावी अशी आकांक्षा होती. विनोबांची स्त्रीशक्तीविषयक कल्पना आध्यात्मिक– धार्मिक आहे तर गांधीजींची स्त्रीशक्तीविषयक कल्पना बव्हंश ऐहिक आणि आंतरिक दिसते.

साने गुरुजींसारख्या मंडळींना स्त्रीच्या अद्‌भुत शक्तीचे स्वरूप हे वात्सल्यमय असल्याचे जाणवले. परंतु हा वात्सल्यभाव संतान-प्राप्तीने परिपूर्ण होतो असे त्यांनी मानले नाही किंवा तो स्त्री-शरीराच्या बंधनांतच अडकलेला आहे अशीही त्यांची कल्पना नव्हती. माउलीचे पद वात्सल्यभावाची साधना केल्यास पुरुषांनाही प्राप्त होऊ शकते असे ज्ञानेश्वरांपासून साने गुरुजींपर्यंतच्या पुरुषांनी गोचर करून दिले आहे. 'श्यामची आई' या पुस्तकात जागृत स्त्रीशक्तीचे अत्यंत हृदयस्पर्शी, देखणे रूप साने गुरुजींनी दाखवले आहे. 'भारतीय संस्कृती' या त्यांच्या ग्रंथात या विषयाची चर्चा आलेली आहे. 'स्त्री जीवन' या त्यांच्या संकलनात स्त्री-शक्तीची अद्‌भुतता स्त्रियांच्या अलिखित साहित्यातून कसकशी प्रकट झाली आहे ते दिसून येते.

स्त्री-शक्ती जागरण हे ह्या अर्थाने स्त्री शरीरमर्यादित नसून मानव-जीवनव्यापी आहे. महात्मा गांधींच्या विचारात त्याचा धागा सापडेल. आणि जयप्रकाशांना अभिप्रेत असणाऱ्या संपूर्ण क्रांतीच्या कल्पनेशी तो धागा सहजच जुळतो.

विनोबांच्या प्रेरणेने गेली काही वर्षे स्त्रीशक्ती जागरणासाठी प्रयत्न चालू आहेत. देशात अनेक ठिकाणी पदयात्रा निघतात. चार भगिनींनी एका तपाची भारत परिक्रमा नुकतीच पूर्ण केली. ता. ३०–३१ डिसेंबर १९७९ आणि १ जानेवारी १९८० अशा सांध्यावर पवनारला विश्व स्त्रीशक्ती संमेलन भरत आहे. संमेलनासाठी काही विषय मुक्रर करण्यात आले आहेत. विश्व स्त्री-शक्ती संमेलनाच्या निमित्ताने साधनेचा हा विशेषांक. स्त्रीशक्तीचे स्वरूप, उगम आणि विनियोग या संबंधी काही स्त्रियांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. कागदाच्या सध्याच्या परिस्थितीत एका अंकात ही चर्चा पूर्ण होणार नाही. काही लेख या अंकात दिलेले आहेत. उरलेले काही नंतरच्या अंकांतून क्रमाने येतील. ◎ ◎

# आजच्या संदर्भात स्त्री-शक्ती

मृणालिनी देसाई

निसर्गत: सृजनाची सारी प्रक्रिया सहन करण्याची बलवत्तर शक्ती स्त्रियांना लाभलेली आहे. त्याचप्रमाणे जन्म दिल्यानंतर संगोपनासाठी जी चिकाटी लागते, सहज त्याग असावा लागतो, मनावर ताबा असावा लागतो तोही स्त्रीला स्वभावगतच लाभलेला असतो. परंतु जी गोष्ट सहजासहजी लाभते ती गृहित धरली जाते. स्त्रीला स्वत:लाच या शक्तीची जाणीव कमी. उलट या शक्तीलाच 'निर्बलता' मानून ती अगतिक होऊन राहिलेली दिसते.

### अगतिकतेची कारणपरंपरा

अर्थात या मागेही एक कारणपरंपरा आहे. गर्भधारणेची आणि बालसंगोपनाची जबाबदारी ती एकटीच पार पाडीत असली तरी त्या काळात तिला सुरक्षित निवाऱ्याची जरूर असते. प्रत्येक वेळी आपल्या जिवाच्या करारावर ती नव्या जिवाला जन्म देते. आणि नंतर काही वर्षे संगोपनात तिची सारी शक्ती खर्ची पडत असते. यावेळी इतर जबाबदाऱ्यांतून तिला मुक्तता हवी असते. त्यासाठी तिने घराचा अडोसा आणि पिता, पती आणि पुत्राकडून संरक्षणाची अपेक्षा ठेवली. संरक्षण अर्थातच मिळाले, पण ते त्या काळापुरतेच मर्यादित न राहाता तिलाही कायमचेच हवेसे वाटू लागले आणि पुरुषानेही ते दिले.

ते कायम टिकवण्यासाठी ती मुद्दाम प्रयत्न करू लागली. घरकामात टापटीप, सुग्रणपणा, दैहिक सौंदर्याचे जतन, लाघवी, लाडिकपणा अशा वेगवेगळ्या मार्गांनी ती आपले स्थान टिकवण्यासाठी प्रयत्न करू लागली. पुरुष त्यामुळे सुखावले. त्याचप्रमाणे सृजनाच्या प्रक्रियेत पुरुषाचा वाटा अगदी थोडा. जबाबदारीही नावाचीच. स्त्रीने आपले पावित्र्य, शील सारे त्या एका महत्त्वाच्या घटनेभोवतीच केंद्रित केल्यामुळे स्त्रीचे ते मर्मस्थान झाले. पुरुषाच्याही प्रतिष्ठेचा प्राणप्रश्न 'स्त्रीचे शीलरक्षण' हाच होऊन बसला. रक्षणासाठी जी शारीरिक क्षमता हवी तीही पुरुषाजवळ होती. स्त्री त्यामानाने डावीच होती. त्यामुळे ती 'भीरू' 'अबला' होऊन बसली.

### मातृत्व दुर्बलता नव्हे

परंतु यंत्रयुगात हे सारे जुने संदर्भ पार बदलून गेलेले आहेत. आता एक तर मातृत्व स्वीकारावे किंवा नाही हे माणसाच्या हाती आहे. कोणीही सर्वसामान्य स्त्री स्वत: स्वत:चा निर्णय घेऊ शकते. शील आणि पावित्र्याच्या साऱ्या कल्पना आता त्या एकाच बिंदूवर केंद्रित करण्याचे कारण नाही. केवळ शरीर सांभाळण्यासाठी भित्रेपणा, लाचारी, मन मारणे अशा गोष्टी करून खरे चारित्र्य डावलण्याची जरूर नाही. स्त्री निर्भयपणे जगू शकते. सत्याची उपासना करू शकते. ब्रह्मचर्याचे पालन करण्याचा, अविवाहित राहाण्याचा तिला पूर्ण अधिकार आहे. किंबहुना कोणाही माणसाला असावेत ते सर्वच अधिकार तिला आहेत. ती एक 'माणूस' आहे हे या यंत्रयुगाने जगाला पटवून दिलेले आहे. ती मातृत्व स्वीकारते ही तिची दुर्बलता नाही, तिने दाखवलेली उदार कर्तव्यतत्परता आहे.

### बलविषयक कल्पनांना नवाच पैलू

संरक्षणाच्या बाबतीत तर सारेच पारडे आता उलटलेले आहे. पूर्वी समोरासमोर द्वंद्वे होत. तलवारीच्या चकमकी झडत. त्यावेळी मनगटाचे बळ हे बळ होते, पण अणुयुगात त्या बळाला फार थोडा अर्थ उरलेला आहे. बॉंब कोसळला तर तो साऱ्यांच्याच डोक्यावर कोसळतो. सारेच त्यापुढे हतबुद्ध होतात. संहाराच्या, त्रास देण्याच्या, छळण्याच्या सुद्धा नव्याच तऱ्हा निर्माण होत आहेत आणि नेमकी येथेच स्त्रीच्या शक्तीची जाणीव जगाला उपयुक्त ठरावी अशी आहे.

विज्ञानाच्या सर्व अशरीरी, बऱ्यावाईट शक्ती मानवमात्राच्या हातात खेळत आहेत. त्या संयमाने, चांगल्या मार्गाने, स्वत:च्या आणि जगाच्या भल्यासाठी वापराव्या ही भावना त्याच्या मनात जागवण्याचे काम त्याला जन्म देणारी माताच करू शकेल. परस्परांमधे सद्भाव तीच निर्माण करू शकेल.

### स्त्रीचे सर्वात मोठे वैभव

अणूची भयंकर शक्ती जेव्हा जगाला जाळीतपोळीत प्रगटली तेव्हा माणसाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेला आळा घालण्यासाठी साऱ्या जगातल्या मातांची एक प्रातिनिधीक सभा जिनिव्हाला झाली होती. त्या थरथरत्या वृद्ध हातांनी या विध्वंसक शक्तींना अजूनही थोपवून धरलेले आहे. आणि ज्या जपानमध्ये अणू फुटला त्या जपानला निराशा, वैफल्य, भ्रष्टाचारापासून वाचवण्यासाठी देखील तेथील स्त्रियाच एकत्र जमल्या. लाकडी हाताचा 'जरा थांबा' सांगणारा पंजा घेऊन शेकडो स्त्रिया ही दूषणे दूर करण्यासाठी धावून जात. अंतरीच्या कळकळीने, प्रेमाने मागितलेले मागणे कोणी नाकारले नाही कारण या जगात निर्मळ प्रेमच दुर्मिळ झाले आहे आणि तेच स्त्रीचे सर्वात मोठे वैभव आहे.

आपल्यापाशी असलेली ही शक्ती स्त्रीची स्त्रीलाच जाणवायला हवी आहे. तिने सौंदर्याचे किंवा लाचारीचे पांघरूण घेऊन संरक्षण शोधणे सोडून देऊन आत्मविश्वासाने, निर्भयपणे स्वत:ला आणि स्वत:च्या मुलांना जसे जग हवे असेल तसे निर्माण करण्यासाठी पुढे येण्याची जरूरी आहे.

त्यासाठी जगातील आजचे प्रश्न काय आहेत, ते सोडवण्याचे संभाव्य मार्ग कोणते असू शकतील याचा अभ्यास करणारी, प्रयोग करणारी स्त्री मंडळे निर्माण व्हायला हवी आहेत. सौंदर्य प्रसाधनामागे लागलेल्या नटव्या बाहुल्या, नवसासायासांनी दु:खे दूर करू पाहाणाऱ्या भाबड्या आणि आळशी आणि काहीच न करता आला जन्म नुसताच पुरा करणाऱ्या नाकर्त्या स्त्रियांचे युग आता संपले आहे. ही जाणीव झाली नाही तर आपणही संपून जाऊ आणि आपली शक्ती अशी अमर्याद आहे की आपल्याबरोबरच माणूसही संपून जाईल!

# नव्या युगाचे नवे आव्हान !

## तारा धर्माधिकारी

भारतीय स्त्री-शक्तीचा आविष्कार बौद्ध धर्माचा जगभर प्रसार करणाऱ्या संघमित्रेपासून झाला असे इतिहास सांगतो. अलिकडली ताजी बातमीही भारतीय स्त्री-शक्ती नोबेल पारितोषिकांची मानकरी आहे, त्याग, करुणा, सेवा यांची अभेद्य मूर्ती आहे हे सिद्ध करते. मदर तेरेसाची कर्मभूमी भारत आहे, तिची प्रेरणा भारतातील आहे. या प्रसंगी 'पोटाची भूक, गरिबीची भूक, अन्न व वस्त्र गोळा करून कशी तरी दूर करता येईल पण पश्चिमेकडील ही अध्यात्माची गरिबी कशी दूर करू शकू' अशी चिंता या मातृशक्तीने प्रकट करून दाखवली आहे. पवनारला भरत असलेल्या विश्व स्त्री-संमेलनाला यावेळी म्हणूनच एक वेगळी चिंतनात्मक पार्श्वभूमी लाभली आहे.

### महाराष्ट्रात विश्व स्त्री-संमेलन !

महाराष्ट्रात विश्व स्त्री-संमेलन भरत आहे हे सर्वार्थाने योग्यच आहे. भारतीय स्त्री-शक्ती किती महान आहे हे दाखवणारी एक लोकोत्तर स्त्री-पंडिता रमाबाई याच महाराष्ट्रात होऊन गेली. स्त्री-शक्तीचा सारा आविष्कार तिच्या ठिकाणी प्रकटला असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही इतके प्रभावी, बंडखोर, अलौकिक, आध्यात्मिक समाज-सेवी संताचे आदर्श जीवन ही स्त्री जगली. १८८८ ते १९२२ च्या पारतंत्र्याच्या काळात तिने संस्कृत विद्या हस्तगत केली, व स्त्री-शूद्रांना निषिद्ध असलेली वेदविद्या पारंगत केली. ही तेजस्वी महाराष्ट्र कन्या, प्रचारिक, आध्यात्मिक क्षेत्रात वाटचाल करूनही समाजापासून विन्मुख राहिली नाही. दलितांची, पीडितांची, आपद्ग्रस्तांची, स्त्रियांची सेवा करणे हेही या स्त्रीच्या जीवनाचे अविभाज्य अंग होते. तिने इंग्लंड, अमेरिका इ. पाश्चिमात्य जग आधुनिक नजरेने, वैचारिक दृष्टीने न्याहाळले होते. अशा तऱ्हेने स्त्री आंदोलनाची नायिका शोभणाऱ्या या स्त्रीची जीवननिष्ठा हेच स्त्री-शक्तीचे खरे प्रतीक आहे. म्हणून साऱ्या जागतिक स्त्रियांचे स्वागत करताना महाराष्ट्राला अत्यंत आनंद होत आहे.

### स्वातंत्र्यपूर्व– स्वातंत्र्योत्तर स्त्री-शक्ती

टिळक गांधींच्या जमान्यात घरी बसलेल्या मध्यमवर्गीय स्त्रिया समाजात, राजकारणात भाग घेऊ लागल्या होत्या. कर्वे यांच्या विविध संस्थांतून, मिशनरी संस्थांमधून शिक्षण घेतलेल्या स्त्रिया मोकळ्या मनाने वागू लागल्या. त्यात पांढरपेशा स्त्रिया, सर्व जातीय शिक्षित अर्धशिक्षित, गांधी आश्रमातून, स्वराज्य आंदोलनातून काम करणाऱ्या स्त्रिया, डाव्या व श्रमिक आंदोलनातून काम करणाऱ्या स्त्रिया यांचा समावेश होता.

स्वातंत्र्योत्तर काळातही स्त्रिया जवळजवळ सर्व लहान मोठ्या आंदोलनातून भाग घेत आहेत. चिकाटी, आक्रमकता, लढाऊ वृत्ती दाखवणाऱ्या या स्त्रियांत मध्यमवर्गीयांबरोबर श्रमिक स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे. त्यांनी महागाई, टंचाईविरुद्ध आंदोलने उभारली. गिरणी, विडी, औषधी कारखाने येथील स्त्री मजूर व ग्रामीण भागात किसान कन्या, आदिवासी स्त्रिया या मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. मोठ्या औद्योगिक केंद्रांमधून, जिल्ह्याच्या, तालुक्याच्या ठिकाणी आता श्रमिक स्त्रिया, झोपडपट्टीतील स्त्रिया, मोठ्या संख्येने निदर्शने, मोर्चे यात सामील होऊ लागल्या आहेत. लढाऊ ट्रेड युनियनच्या चळवळीचा परिणाम म्हणून मध्यमवर्गीय शिक्षिका, परिचारिका, कर्मचारी स्त्रिया, ग्रामसेविका यांची प्रचंड भागीदारी सर्वत्र दिसून येत आहे. शासनाने महिला कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याची व्यवस्थाही केलेली आहे.

सामूहिक स्त्री-शक्ती अशी वाढताना दिसली तरी व्यक्तिशः स्त्रीला मात्र स्वतःला परिस्थितीला शरण जावे लागते आहे याची खंत वाटू लागली आहे. राजकारण, विज्ञान, सार्वजनिक क्षेत्र, नृत्यगायन, चित्रकला या सर्व क्षेत्रांत स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने कर्तृत्व दाखवून दिले आहे. याबाबतीत पुरुषाला मागे टाकल्याची उदाहरणे-ही ज्ञात आहेत. परंतु या स्त्रिया स्त्री जातीचे प्रतिनिधित्व करू शकल्या नाहीत. मानव चंद्रावर पोचला व स्त्री त्याची 'अंतराळवीर' म्हणून सोबतीला राहिली तरीही स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे ही सामाजिक भावना अद्याप सर्व स्तरात रूढ झालेली आहे.

स्त्रीला मानव म्हणून स्वतंत्र मूल्य आहे ही भावना अजून सुधारलेल्या पाश्चिमात्य जगातही दाखल होऊ शकली नाही, ही खरी वेदना आहे. आदमईव्हच्या काळापासून स्त्री ही कनिष्ठ दर्जाची उपभोग्य वस्तू मानली गेली आहे. स्त्रीनेही पराक्रमी पुरुषाचे संरक्षण पत्करून ही भूमिका कायम ठेवली. पुरुषप्रधान व्यवस्थेत तिला सतत अन्याय सहन करावा लागला आणि तो सहन करणे तिच्या अंगवळणी पडून गेले, हीच खरी स्त्रीजीवनाची शोकांतिका आहे.

जगाच्या तीन देशांत स्त्री पंतप्रधान म्हणून वावरली, विज्ञानयुगात 'अंतराळवीर' म्हणून भ्रमण करू शकली, जागतिक संघटनांचे अध्यक्षपद भूषवू शकली, परदेशाची राजदूत– देशाची प्रतिनिधी बनू शकली तरीही अगदी पाश्चिमात्य देशातही पुरुषांबरोबर समान भूमिकेतून समाजजीवन जगणे तिला आजही कठिण जात आहे. त्याबाबतीत सर्व अर्थाने स्वतंत्र, मुक्त जीवन जगणारी पाश्चिमात्य स्त्री व पुरुषप्रधान व्यवस्थेत पिचलेली भारतीय स्त्री या दोघीही एका आंधळ्या रस्त्याच्या ( Blind Lane ) टोकाशी येऊन पोचले आहेत. स्त्रीजीवनाच्या मुक्तीचा मार्ग त्यांना अजूनही सापडलेला नाही. त्याचा शोध घेण्याचे हे प्रयोजन !

### 'वुईमेन्स लिब' चळवळ नव्हे प्रतिक्रिया !

पाश्चात्य देशातील स्त्री-मुक्ती आंदोलनाने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. पुरुषापासून मुक्ती हा या चळवळीचा नारा आहे. आम्हाला पुरुषाची 'बटीक' म्हणून राबावयाचे नाही. केवळ त्याची चूल व मूल सांभाळणे आमचे काम नव्हे. आम्हाला व्यक्तिस्वातंत्र्य हवे, आर्थिक

स्वातंत्र्य हवे. नोकऱ्यात स्त्रियांचे प्रमाण वाढविले पाहिजे. त्यांना घटस्फोट मिळाले पाहिजेत. मुलांची जबाबदारी एकटचा स्त्रीवर पडता कामा नये. आम्ही पुरुषांच्या हुकूमात राहणार नाही. आमच्या साम्राज्यातून पुरुषाला हाकलून लावू इथपर्यंत या चळवळीची मजल गेली आहे.

कोणत्याही उपायांनी पुरुषविरहीत जीवन जगण्याची आकांक्षा व्यक्त होत आहे. म्हणून ही चळवळ एकांगी, अतिरेकी व निसर्गविरोधी ठरू पाहात आहे. त्यांची वाटचाल पुरुषप्रधान संस्कृतीकडून पुरुष-निरपेक्ष संस्कृतीकडे होऊ पाहात आहे. 'आम्हाला पुरुषांची गरज नाही' हा विचार योग्य नव्हे. विज्ञानाने कितीही आधुनिकता आणली, 'टेस्ट टचूब बेबीज' निर्माण केल्या तरी निसर्गाचे प्रयोजन थांबविता येणार नाही. ही चळवळ अपयशी ठरली याचे कारण तिचे रूपांतर लिंगवर्चस्वाच्या चळवळीमधे होऊ लागते. पुरुषनिरपेक्ष जीवन याचा अर्थ 'मुक्त – काम' असा होऊ लागला. त्यामुळे स्त्रीचे जीवन अधिक वासनामय होऊ लागले. आचाराचे स्वातंत्र्य वाढले तसतशी मुक्त समाजात जगताना स्त्रीला अधिकाधिक भीती वाटू लागली. त्यामुळे तिला पुरुषाच्या संरक्षणाची आवश्यकता भासू लागली.

अशा तऱ्हेने आजची सुशिक्षित स्त्री पुरुषाला भिते व पुरुषाचेच संरक्षण मागते.

अशी विचित्र अंतर्विरोधी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण 'लिब मूव्हमेंट' ही प्रतिक्रिया आहे. स्वभावतः स्त्री पुरुषाचे नाते प्रेमाचे आहे, शत्रुत्वाचे नाही. एकमेकाच्या सहयोगाशिवाय पुरुषाचा जन्म होऊ शकत नाही, व स्त्रीचाही जन्म होऊ शकत नाही. मानवी जीवनाची संपन्नता व पूर्तता या स्त्री पुरुषाच्या सहजीवनातच आहे. म्हणून स्त्री पुरुषाचे सहजीवन घडवणाऱ्या संस्था जोपसल्या गेल्या पाहिजेत. या सामाजिक संस्थांमधून कुटुंबांमधून, स्त्रीचे मानव म्हणून मूल्य आहे, ही वृत्ती जोपासली गेली पाहिजे.

## समाजजीवनात समान भूमिका नाही

जर्मनीमध्ये एका महिला संघटनेने ठराव मांडला की तेथे पुरुषांना रात्री सात वाजल्यानंतर हिंडण्याची मनाई करण्यात यावी. कारण त्यामुळे स्त्रीच्या अब्रूला धोका निर्माण होतो व बलात्काराचे प्रमाण वाढते. याचा अर्थ असा की, स्त्री-मुक्ती आंदोलन हे स्त्रीला समान भूमिकेवर आणण्यास अपयशी ठरले आहे. हा प्रश्न शास्त्रशक्ती किंवा शारीरिक शक्ती यांच्या बळावर सुटणार नाही. आजच्या अणु-युगातही शास्त्रशक्तीवर स्त्रीला विश्वास ठेवता येत नाही. सशस्त्र पुरुषाचे संरक्षण तिच्या कामी पडत नाही हे इतिहासाने दाखवून दिले आहे. साऱ्या जागतिक युद्धामध्ये स्त्रीचे शीलसंरक्षण कसे होईल हा यक्षप्रश्न प्रत्येक राष्ट्रापुढे ठाकला होता. ज्या ज्या देशात युद्धे झाली, त्या त्या देशात स्त्रिया अत्याचाराला बळी पडल्या. अनौरस, अवांच्छित संतती निर्माण झाली आणि आमच्या सभ्यतेच्या परंपरा आणि संस्कृती यांची सारी झालर गळून पडली.

## स्त्रीच्या प्रतिष्ठेचा नवा मानदंड !

विज्ञान किती पुढे गेले तरी स्त्री ही सांभाळण्याची व पळवण्याची वस्तू राहिली. म्हणून समाजामध्ये बलात्कार झालेल्या स्त्रिया व अनैतिकतेने जन्माला येणारे मूल याबाबत नवे संकेत रूढ करावे लागतात. शरीर भ्रष्ट झाल्याने स्त्री भ्रष्ट होऊ शकत नाही. तिच्या शारीरिक, मानसिक पुनर्वसनाची जबाबदारी समाजाची आहे हे माना-वेच लागेल. तसेच कोणत्याही संबंधातून जन्माला येणारे मूल हे नेहमीच पवित्र व निरागस राहील. या बालकांचा सांभाळ करणे, त्याला जीवनाची संधी प्राप्त करून देणे, हे सामाजिक कर्तव्य आहे. आणि हे काम सामाजिक बांधिलकी, समाजसेवा या भावनेतून करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या संस्था मोठ्या प्रमाणात स्थापित झाल्या पाहिजेत. तरच स्त्रीचा मान राखण्याचा नवा मानदंड प्रस्थापित होईल व पुरुषवर्गाला तिच्याबद्दल आदरभाव निर्माण होईल.

परस्परांबद्दल आदरभाव, प्रेमभावच स्त्रीला जीवनात समान भूमिके-वरून जगण्यास मदत करू शकेल. तसेच कुटुंबसंस्था, विवाहसंस्था आदी सामाजिक अभिसरणाच्या संस्था कार्यरत झाल्या पाहिजेत. समान भूमिकेतून जगण्यासाठी स्वतः स्त्रीच्या मनात तिच्या देहा-बद्दलची जी रूढ कल्पना आहे, तिचा पूर्णतः त्याग करावा लागेल. आज ती आपले रूप, आपला देह, ती 'धन' मानते. तिला आपल्या शारीरिक मर्यादांचे जुनेपुराणे संस्कार झटकून टाकावे लागतील.

लोहिया म्हणत, 'स्त्री-पुरुषांना नीती-अनीतीची वेगळी फूटपट्टी नसावी. स्त्रियांनी आपल्या डोक्यावरील योनिशुचितेचा बोजा फेकून द्यावा. परंतु तूर्त तरी त्यांना दलितांप्रमाणे सवलती हव्यात.' माता, भगिनी, पत्नी यापलीकडे स्त्रीचे नाते संभवतच नाही काय ? स्त्रियां-कडे सहकारी, सल्लागार, नेता, इ. नात्यांनी बघताच येणार नाही काय ?

## कुटुंबसंस्थेचे पुनःसंस्करण

ही सारी भावना निर्माण करण्यासाठी स्त्री-शक्तीला आज कुटुंबसंस्था, व विवाहसंस्था यांचे पुनःसंस्करण करावे लागेल. त्यात स्त्री-शक्ती जागृत करून त्यात आमूलाग्र बदल घडवून आणावे लागतील व त्यांचा आधार स्नेह, प्रेम राहील. कौटुंबिक भावनेचा विस्तार करणे हेच खरे सांस्कृतिक जीवनाचे गमक आहे. फक्त नवरा-बायको-मुले नव्हेत तर सासू-सासरे, दीर-नणंदा इतर नातलग सोबत घेऊन जगणे व कौटुंबिक भावनेचा सामाजिक स्तरावर विस्तार करणे हाच मुळी कुटुंबसंस्थेचा पाया आहे. पण औद्योगिकरणाच्या संस्कृतीत व व्यवहारी बनण्याच्या शर्यतीत आपण सारी कुटुंबसंस्था नष्ट करीत आहोत, हाही विवेक राहिला नाही. आपण 'विष' पेरतो व मग अमृताच्या फळाची अपेक्षा करतो. पुरुष हा कोणाचा तरी पती, पिता, पुत्र वा मित्र म्हणून जगत असतो व कुटुंब प्रमुख म्हणून साऱ्यांची काळजी वाहतो. कुटुंबात स्त्री-पुरुष सहजप्रेमाने एकत्र येतात, निरागस मैत्रीचा आनंद लुटतात व एक-मेकांच्या सहयोगाने जीवनाला सामोरे जातात. परंतु आमच्या कुटुंब-संस्थेचा मुख्य दोष असा की, स्त्रीच्या गौण भूमिकेतून ती यशस्वी झाली. त्यामुळे स्त्री स्वतंत्र भूमिकेतून जगू लागल्याबरोबर ती डोलाऱ्यासारखी कोसळू लागली. पाश्चिमात्य देशात या कुटुंबसंस्थेचे कौतुक आहे. येथे 'वृद्धाश्रम' काढावे लागत नाहीत, याचे यांना वैषम्य वाटते. पण आता ही कुटुंबसंस्था सांभाळणे हे नव्या स्त्रीला आव्हान ठरणार आहे. कारण त्याचा जुना पुराणा साचा बदलून गौणत्वाची भूमिका सोडून नेतृत्वाची, कणखर, खंबीर भूमिका निभवावी लागेल.

ासाठी या विज्ञानयुगात स्त्रीला सुविध, सुविचारी, सुशिक्षित बनून व्या रचनेचे पाईक बनावे लागेल.

### विवाहसंस्थेचा आधार प्रेम-समादर भाव

ा नव्या समाजरचनेत विवाहसंस्था करार राहणार नाही. ती केवळ ाम-प्रधान नको, प्रेमप्रधान झाली पाहिजे. परस्परांची वासनापूर्ती ा उद्देश राहणार नाही. संततीसाठी जबाबदारीची जाणीव ठेवावी ागेल. बेजबाबदार स्वकेंद्रित जीवनाऐवजी संयमित जीवनाचे संकेत ाळावे लागतील. विवाहाचा बाजार व व्यापार थांबवावा लागेल. ंडा देणे, घेणे बंद झाले पाहिजे. थोडक्यात म्हणजे कुटुंबसंस्था व बवाहसंस्था स्त्री-पुरुषाच्या सहयोगाने नवीन प्रतीकें, नवीन जाणीवा ेऊन उदयास आल्या पाहिजेत. तरच समाजजीवन अधिक व्यापक णखर स्त्रीशक्तीचे केंद्र बनून विकसित होईल.

### बीभत्सता, लैंगिकता व अश्लीलता याविरुद्ध मोहीम

ाजकाल जगात सर्वत्र अश्लील, लैंगिक वाङ्मय, सिनेमा याचा फैलाव होत आहे. लैंगिक गुन्हे, हिंसाचार बोकाळत आहे. पाश्चात्त्य जगाबरोबर आम्हाला त्याची झळ लागत आहे. म्हणून जगातील सर्व स्त्रियांनी या मोहिमेत एकत्र होण्यास कोणताच प्रत्यवाय नसावा. ाहिरातबाजीसाठी स्त्री-देहाची भयंकर विटंबना चालू आहे. लहान ुलांवर त्याचे विघातक परिणाम प्रत्ययी अनुभवास येत आहेत. ्हणून आता स्त्रियांनी अमेरिकेतही बीभत्स वाङ्मय, अश्लीलता, सिनेमे याविरुद्ध निषेध मोहीम चालू केली आहे. हे साहित्य विकणारी ुकाने, जागा हुडकून, काढून फिल्म्स् दाखवणाऱ्या जागा शोधून त्याठिकाणी मोर्चे नेणे सुरू आहे. कारण त्यांचे असे म्हणणे आहे की, स्त्रिया आणि मुले यांच्याबाबत जे लैंगिक गुन्हे घडत आहेत त्यांचे प्रमाण चिंताजनक व धोकादायक आहे.

या मोहिमेची एक संघटक व 'अगेन्स्ट अवर विल,' या पुस्तकाची लेखिका सुसान ब्राऊन मिलर म्हणते की, बलात्कार हा स्त्रियांना छळण्यासाठी वापरावयाचे एक राजकीय व सामाजिक साधन आहे. गटागटाने जमून स्त्रिया निषेध-मोर्चे काढीत आहेत. या मोहिमेची क्लीव्हलँड मधील एक कार्यकर्ती सान्ड्रा कोस्टर म्हणते, 'कमीत कमी या बाबतीत तरी सर्व स्त्रियांनी एकत्रित झालेच पाहिजे. कारण कोणत्याही स्त्रीवर बलात्कार होऊ शकतो व तिला मार खावा लागतो.' या आंदोलनाच्या टीकाकारांना वाटते की त्यांनी आपला निषेध, हिंसेने नोंदवू नये. पुस्तक, वाङ्मय, फिल्म्स् जाळून ही वृत्ती जाणार नाही. परंतु तरीही या सर्व कार्यकर्त्यांची अशी जिद्द आहे की हा प्रश्न राज्य विधी मंडळापर्यंत नेला पाहिजे. कारण हा प्रश्न स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचारांचा प्रश्न आहे. अश्लील व बीभत्स वाङ्मय वाचून, सिनेमे पाहून, संस्कारक्षम मुलांवर परिणाम होऊन विकृती निर्माण होते, हा अनुभव कोणाला नाकारता येईल असे वाटत नाही.

त्यामुळे याबाबत जागतिक स्तरावर स्त्रियांनी एकत्र होण्यास काहीच हरकत नाही. जागतिक स्तरावर अमंगल, अशोभनीय नाहीसे करण्याचा हा स्त्रीशक्तीचा प्रयत्न स्तुत्य नाही असे कोण म्हणेल?

महात्मा गांधींची क्रांतिकारक भूमिका स्त्री–शक्तीचा आधार राहील. ाणसाची शक्ती शरीरात नाही, कणखर मन, 'मनोबल' हे नवे मूल्य तिला समाजात दाखल करावे लागेल. शरीराने अशक्त असणाऱ्या गांधींनी व त्यांच्या असंख्य बांधवांनी केवळ मनोबलाच्या आधारावर ब्रिटिश साम्राज्याला निःशस्त्रपणे हादरा दिला हे विसरता येणार नाही. या गांधींच्या देशातील भारतीय, स्त्री-शक्ती या संस्थामधून नवीन समाजपरिवर्तनाची क्षितिजे निर्माण करील व नव्या क्रांतीच्या वाटा साऱ्या जगाला दाखवून देईल. पुरुषाची प्रतिकारशक्ती व स्त्रीची निर्माणशक्ती, पुरुषाची श्रमशक्ती व स्त्रीची कलात्मकता यांचा संयोग घडवून आणणारी नवी स्त्री-शक्ती उदयास यावी लागेल.

### प्रश्न सामाजिक जाणिवेचा !

अनेकदा प्रश्नांची उकल झाली व प्रश्नांची व्याप्ती समजली की उपाय शोधण्यास बरीच मदत होते. परंतु शेवटी हा प्रश्न स्त्री-पुरुष या दोघांची स्त्रीकडे बघण्याची भूमिका बदलल्याशिवाय सुटणार नाही. ही भूमिका बदलण्यासाठी समाजातील प्रतिष्ठित व उच्चभ्रू लोकांनी आपले, जीवन राहणी व सामाजिक व्यवहार यात आमूलाग्र बदल करून काही सामाजिक पायंडे प्रस्थापित करावयास हवे. अनेकदा असे दिसून येते की आजची सामाजिक परिस्थिती ही यांच्या सोयीची असल्या-मुळे ती बदलावी असे त्यांना वाटत नाही. उगीच थातुरमातुर उपाय सुचवायचे, त्यावर वक्तव्ये करावयाची आणि जीवनात मात्र त्याविरुद्ध आचरण करावयाचे त्यामुळे या प्रश्नांच्या चर्चेला 'फॅशन ऑफ दी डे' चे स्वरूप येऊ पाहात आहे. समाजातील काही अन्याय दूर करण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत. हे कायदेही थातुरमातुर आहेत, ज्याला कायद्याच्या भाषेत ( Lawless Law लॉलेस लॉ–बेकायदेशीर कायदा ) म्हणतात. हुंडाविरोधी कायद्याचे स्वरूप असेच आहे. त्या सर्व कायद्यांत अंगीभूत पळवाटा कायम ठेवलेल्या आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्याचा उपयोग फारसा होत नाही. हे कायदे ज्यांच्यासाठी असतात त्यांच्यापर्यंत पोचत नाहीत. त्यांना त्याची जाणीवही नसते.

तेव्हा स्त्रीवर होणाऱ्या अन्याय निर्मूलन योजना व कायदे त्यांना योग्य प्रसिद्धी देऊन हे कायदे ज्यांच्याकरिता आहेत त्या सामान्य माणसापर्यंत पोचवावे लागतील. अशा योजनेला व कायद्याला लोक-मताचा आधार मिळेल अशी व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे भ्रूणहत्या, बलात्कार याबाबत समाजाची व कमीत कमी स्त्रीची भूमिका व मनोकामना बदलावी लागेल.

संबंध अनैतिक असले तरी जन्माला येणारे मूल अनैतिक नसते, हे समाजाने मानून त्याला प्रतिष्ठित जीवन मिळेल अशी सामाजिक भूमिका तयार केली तरच या प्रश्नाची उकल होणे सोपे जाईल. तद्वतच बलात्काराने मनाविरुद्ध घडलेल्या अत्याचाराने, स्त्री अगर स्त्रीत्व भ्रष्ट होत नाही, हे स्त्रीलाच कळावे लागेल. याबाबतीत स्त्रीचीच मनोवृत्ती बदलणे अत्यावश्यक आहे. आजही राजकीय व सामा-जिक पुढाऱ्यांनादेखील त्यांच्या शारीरिक दुर्बलतेचा फायदा घेऊन मारहाण करण्यात येते. पण त्यामुळे त्यांची बेइज्जत होते अगर प्रतिष्ठा जाते असे आपण समजत नाही.

मनाविरुद्ध होणारे अत्याचार हे स्त्रीची अप्रतिष्ठा करू शकत नाहीत हाच गांधींचा अहिंसेचा विचार होता. शरीर नव्हे तर मन हे स्त्री चळवळीचे मूलभूत गमक असले पाहिजे. आणि आज सशक्त मन तयार करणे हीच खरी काळाची गरज आहे. हाच स्त्रीशक्तीचा आविष्कार ठरू शकेल !

◎ ◎

# स्त्री-शक्ती व मर्यादा

सलमा कय्यूमी

मी बोहरा स्त्रीचे तिच्या समाजात असणारे स्थान मांडणार आहे ! भारताला लोकशाही स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला नागरिकत्वाचा अधिकार घटनेने दिला. आचार-विचाराचे स्वातंत्र्य मिळाले, बोहरा समाज मात्र त्याला अपवाद आहे. धर्मगुरूंच्या गुलामगिरीत तो आजही खितपत पडलेला आहे. या समाजातील स्त्रीला इतर समाजातल्या स्त्रियांइतके दुय्यम स्थान तर राहोच पण आचार, विचार, दैनंदिन व्यवहार, भाषण इत्यादींचे कोणतेही स्वातंत्र्य नाही !

'मिसाक' या शपथविधीमार्फत धर्मगुरूंनी प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या शरीरावर, मनावर, संपत्तीवर सर्वंकष अधिकार गाजवण्याचा हक्कच स्वतःकडे घेतलेला असतो. हे बोहरा समाजातल्या विज्ञाननिष्ठ युवकांनाही अखरत नाही.

दाऊदी बोहरा हे शिया पंथीय. संख्येने अगदीच अल्प. जगात बोहऱ्यांची संख्या एकूण १० लाख. सुमारे दोन लाख कुटुंबांपैकी चाळीस हजार कुटुंबे पूर्व आफ्रिकेतील देश, श्रीलंका, सिंगापूर, हाँगकाँग, कुवेत, इराक अशा देशांत वास्तव्य करून आहेत. ती तुलनेने भारतीयांपेक्षा श्रीमंत आहेत. एकट्या भारतात ८ लाखांवर बोहरा आहेत. भारतात राहणाऱ्या बोहरा समाजाचे मध्यवर्ती केंद्र मुंबईत आहे. तिथे समाजाचे मुख्य ('दाई') यांचे वास्तव्य असते. मुख्य केंद्रातून दाई जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या बोहरा बांधवांवर नियंत्रण ठेवतात. थोडक्यात एकाहाती वर्चस्व गाजवण्याचा हा राजरोस मार्ग आहे.

धर्मगुरूंनी स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान (इमेज) निर्माण केले आहे. अनुयायांच्या मनावर तशी प्रतिमा बिंबवली जाते. धर्मगुरू (दाई) हे डायरेक्ट परमेश्वराचे अवतार असतात. त्यामुळे पृथ्वी-तलावरील कोणतेही कायदेकानू त्यांना लागू होऊच शकत नाहीत. दाईच्या परवानगीशिवाय लग्न केले तर ते बेकायदेशीर व त्यापासून निर्माण होणारी संतती अनौरस मानली जाते. एखाद्या अनुयायास हवा तेवढा दंड करण्याचा अधिकार दाईंना आहे. अशा प्रकारे अनियंत्रित अधिकाराच्या जोरावर बोहरा धर्मगुरू आपले वर्चस्व गाजवतात.

### जनतेला जेरीला आणणारी चार शस्त्रे

धर्मगुरूंजवळ मिसाक, रजा, बारात व शबाब ही चार अस्त्रे आहेत. या अस्त्रांचा उपयोग स्वतःला वाटेल त्याप्रमाणे वाटेल तेव्हा करतात. बोहरा स्त्री-पुरुषांच्या निष्ठा धर्मगुरूंविषयी इतक्या घट्ट झाल्या आहेत की, आपण आपले सर्वस्व प्रदान करतो आहोत, दुसऱ्याचा चुकीचा हुकूम पाळतो आहोत याचे त्यांना काहीही वाटत नाही. म्हणजे आपल्या श्रद्धास्थानांविषयी, वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध विचार करण्याची शक्ती सर्व क्षेत्रांत काम करणाऱ्या पुरुषांनी गमावली आहे. बायकांचे तर काय ...?

'मिसाक' (शपथविधी) हा बोहरा स्त्रीवर अन्याय करणारा एक विधी. पोरवय सरण्यापूर्वीच ती बिचारी या शपथेत गुंतली जाते आणि मग हरपते तिचे बालपण, स्वातंत्र्य आणि विचारशक्ती ! या शपथ-विधीत असे म्हटले आहे की, 'माझा आत्मा, शरीर व मिळवलेली संपत्ती यांवर धर्मगुरूंचा पूर्ण अधिकार राहील. मी माझे सर्वस्व तुमच्या स्वाधीन करते.'

अशा या वचनाच्या आधारे हुकमत गाजविली जाते. 'मिसाक'ची फक्त चाळीस वचने आहेत व ती सर्व अरेबिक भाषेत असतात. ही भाषा समजणारे जेमतेम टक्काभर बोहरा लोक आहेत.

तसेच एखाद्याने या जुलमाविरुद्ध आवाज उठवला तर त्याला जातीच्या बहिष्काराला तोंड द्यावे लागते. त्याला 'बारात' केले जाते. आर्थिक-राजकीय कोंडीपेक्षा हा सामाजिक बहिष्कार महाभयानक असतो. कारण या बहिष्कारात केवळ ती व्यक्ती सापडत नाही तर त्याचे सारे कुटुंब, जवळचे-दूरचे नातेवाईक या सर्वांना जमातीच्या लोकांकडून विरोध व मानसिक छळ सहन करावा लागतो. ही सगळी कृत्ये धर्मगुरू आपल्या 'शबाब' सेनेमार्फत करतात. स्वातंत्र्याच्या उर्मी दडपून टाकण्यासाठी खरे तर उत्पन्नच होऊ नये म्हणून पद्धतशीर प्रयत्न केले जातात.

### बोहरा स्त्री : एक बळी

अशा या धर्मगुरूंच्या दडपशाहीला बळी पडते ती बोहरा स्त्री ! लहान वयातच तिच्या मनावर आई-वडील जे संस्कार करतात त्यामुळे ती जास्त संकुचित मनाची बनते. हे एक प्रकारचे कंडीशनिंगच असते. आपले घर, शाळा, अभ्यास, धार्मिक पठन यापेक्षा काही वेगळे जग असते, त्यातही काही जीवन संपन्न करणारे अनुभव असतात. या जगात आपण थोडफार तरी मिसळले पाहिजे ही तिची भावनाच खुडल्या गेल्या अवस्थेत असते.

शिक्षणाच्या दृष्टीने विचार केला तर शिक्षणाचे प्रमाण स्त्रियांच्या बाबतीत १० टक्के पर्यंत असल्याचे दिसते. पण या शिक्षणाचा प्रत्यक्ष व्यवहारात, स्वतःच्या जीवनात उपयोग काहीच नसतो. शिकायचे ते समाजात प्रतिष्ठा मिरवण्यासाठी, 'आम्ही कोणी तरी मोठे' ही भावना व्यक्त करण्यासाठी व आई-वडलांचा पैसा सुमार्गी लावण्यासाठी. मुलींचे आई-वडीलही असाच विचार करतात.

उदाहरण म्हणून सांगायचे झाले तर आमच्या गावातले सर्वात थोर शेठजी B. Sc. शिकलेले. त्यांनी आपल्या सर्व मुला-मुलींना B. A. किंवा B. Com. पर्यंतच शिक्षण दिले. शिवाय भावा-बहिणींच्या मुलांनाही असेच शिक्षण दिले. पण पुढे शिकायचे नाही. का तर म्हणे माझ्यापेक्षा मुले जास्त शिकली तर माझ्यावर हक्क गाजवतील, शहाणी, हुषार आणि चतुर होतील, त्यामुळे त्यांनी शिकूच नये असली ही संकुचित वृत्ती !

शिवाय गावातले कोणी शिकायला लागले की म्हणायचे 'मुलांना शिकवलं तर मुलं विघडतात आणि मुलींना तर घराबाहेर काढूच नये.' 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हा विशेष सनातनी हिंदूंच्या स्त्रियांइतकाच बोहरा महिलांनाही लागू केला जातो.

### लग्नांची परवड

बोहरा स्त्रियांच्या लग्नाच्या बाबतीत तर कहरच आहे. लग्नासाठी नवरा-बायकोची पसंतीच फक्त पुरेशी नसते तर धर्मगुरूंची संमतीही आवश्यक असते. धर्मगुरू प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात ढवळाढवळ करण्याचे काम करतो. शिवाय लग्न-विधीत नवरा-बायकोने एकमेकाच्या समोर यायचे नसते. मंडपात महाराजाच्या हातात हात घेवून मुलीचे लग्न लागते. आणि मग वाजत-गाजत मुलीला सांगितले जाते की 'बाई आता तुझे लग्न लागले.' तेव्हा ती बिचारी उठून प्रत्येकाला नमस्कार ( सलाम ) करते. यामुळे अनेकदा मुलींची संमती नसताना सुद्धा विवाह होतात. आणि मग, आयुष्यभर मिळालेल्या पतीला पवित्र मानून जगावे लागते. कधीकधी घरातील मोठ्या मंडळींच्या जबरदस्तीखातर लग्न करावे लागते.
यातही एक हास्यास्पद प्रकार असा आहे की मुले-मुली लहान असतानाच लग्न ठरवले जाते. आणि लग्नही नात्यातल्या नात्यातच ठरवतात. सख्ख्या बहीणभावांचा अपवाद वगळता इतर कोणीही कोणाशीही लग्न करू शकतो. मावस–बहीण–भाऊ, मामे–आत्ये, चुलत सर्वांशी लग्न होते. त्यामुळे स्त्री म्हणून तिला हवे-नको विचार करायला वावच नसतो. पसंतीबाबतही आनंदच असतो. यामुळे होते काय की लग्नाचे, नवीन घराचे, स्वतःच्या पतीविषयीचे तिचे आकर्षणही संपते. आला दिवस रेटत राहाणे, एवढेच हाती उरते. धर्मगुरूंच्या, घरातील मोठ्या मंडळींच्या विरुद्ध वागले तर बहिष्काराची तलवार टांगती असतेच, त्यामुळे यांच्यापैकी कोणीही पुढे यायला धजावत नाहीत.

### मेल्यावरही सुटका नाही !

'लग्नविधी', 'दफनविधी' यासाठी सुद्धा धर्मगुरूंची मर्जी सांभाळून परवानगी मिळवावी लागते. प्रेत सडले तरी चालेल पण 'रजाशिवाय' ( परवानगीशिवाय ) पुरता येणार नाही म्हणजे नाही.
एखाद्या व्यक्तीने ही बंधने जुमानली नाहीत तर त्याला 'काफीर' समजले जाते. त्याच्या संपूर्ण कुटुंबाची कोंडी केली जाते, आणि एकदा 'बारात' केले की त्या व्यक्तीच्या व्यापार–धंद्यावर गदा येते. त्याला व्यवसायातून-जीवनातूनच उठवण्याचा प्रयत्न होतो. या गोष्टींचा जाच ऐकताना-वाचताना तेवढा प्रखर वाटत नाही, पण यांच्या वंशाला जो जातो त्याची परवड कुणाला फारशी कळत नाही.
असगर अली उदेपूरवाला यांच्या भावाचे ३० एप्रिल रोजी मुंबईत अपघाती निधन झाले. दुसऱ्या दिवशी १ मे ला त्याच्या नातेवाईकांनी, मित्रमंडळींनी पार्थिव देह कुर्ल्याच्या कबरस्तानात नेला. परंतु प्रेत दफन करण्यासाठी त्यांना सक्त विरोध केला. कारण काय? तर मृताचा भाऊ सुधारणावादी आहे. कबरस्तानचे दरवाजे बंद केले. प्रेत खांद्यावर घेऊन लोक तासनतास कबरस्तानच्या बाहेर खोळंबून उभे होते. वातावरण तंग झाले. शेवटी पोलीसांमार्फत दरवाजा तोडण्यात आला. पण आत खड्डा खणण्यासाठी हत्यारे नव्हती, पाणी नव्हते. दिवे बंद होते. मेल्यानंतरही माणसाचा होणारा असा छळ इतर कोणत्या जमातीत असल्याचे ऐकिवात नाही. बरे! त्याचा गुन्हा काय, तर तो बोहरा समाजात जन्माला आला. तो साधे सरळ जीवन जगला. पण त्याच्या भावाने धर्मगुरूचे वर्चस्व मानले नाही. बस्स ! एवढ्या कारणावरून त्या प्रेताचे हे हाल !
मेल्यावर हा इतका सर्व जाच सहन करायचा. शिवाय बाईने तर आपले तोंड वर करायचे नाही.

### स्त्री-समाजाचा नगण्य घटक

नवरा मेला तर बाईने साडेचार महिने 'इद्दत' मध्ये राहायचे. म्हणजेच पांढरे कपडे घालायचे. डोक्याचे केस सुद्धा दिसता कामा नयेत. तसेच खोलीला पांढऱ्या चादरी लावायच्या. पांढऱ्या कपड्यांवरच बसायचे, झोपायचे. आणि याहीपुढे म्हणजे पुरुषजातीच्या कोणाचेही तोंड बघायचे नाही, अगदी एक दिवसाच्या लहान मुलापासून तो मान डुगडुगणाऱ्या वृद्धापर्यंत ! या सर्वांचे काटेकोर पालन न करून चालतच नाही, कारण समाजाच्या अन्यायाला, बहिष्काराला बळी पडावे लागते.
असल्या या धार्मिक, सामाजिक, बंधनामुळे स्त्री जास्तीत जास्त जखडत चालली आहे. जास्त दुर्बल होत चालली आहे. खऱ्या अर्थाने कोणत्याही समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर प्रथम स्त्री सुधारली पाहिजे. 'बाई सुधारली तर घर सुधारेल' आणि ती आपल्या मुलांवर तसे संस्कार करील. म्हणूनच धर्मगुरूंच्या जाचापासून सुटका करण्यासाठी सुधारणावादी चळवळीचे रोपटे बोहरा स्त्रीच्या मनात रुजले पाहिजे. पुरोगामी बोहरांच्या सुधारणावादी चळवळीने आता चांगलेच मूळ धरले आहे. बंडासाठी स्वतःस झोकून देणारे तरुण पुढे येत आहेत. 'छुपी तहेरिक' सारख्या संघटनेमार्फत बोहरा स्त्रियांनी घराबाहेर निघणे आवश्यक आहे. विचारांची देवाणघेवाण होणे, समाजातील प्रश्नांचा साधक–बाधक विचार करण्याची खरी गरज आहे. स्त्री-स्वातंत्र्यासाठी, आपले हक्क मिळवण्यासाठी स्त्रियांनी एकत्र आले पाहिजे. तरच पुरोगामी संघटना जोर धरेल. सुधारणावादी बोहरांच्या चळवळीस सक्रीय पाठिंबा देणे ही माणुसकीची हाक आहे. एकी करून आणि लढा पुकारून हा धर्मगुरूंनी निर्माण केलेला तुरुंग फोडायचा आहे.

◎ ◎

---


## मुस्लिम सत्यशोधक मंडळ

## उद्देश व भूमिका

**किंमत चार रुपये**

**इंडियन सेक्युलर सोसायटी, पुणे ४**


---

# स्त्री – प्रसार माध्यमांतली !

## सुलोचना वाणी

हिंदुस्थानात जर कधीकाळी 'स्त्री-मुक्ती' चळवळ सुरू झाली तर मुक्ती-मोर्चाचे प्रथम लक्ष्य प्रसार माध्यम हे राहील. ( अर्थातच हे सगळेच स्वप्नरंजन आहे ! )

रेडिओ-टी. व्ही., मासिके, सिनेमा-नाटके- ही सर्व प्रसार माध्यमे स्त्रीला तिच्या दुय्यम स्थानावर डांबून बसवण्यासाठीच वापरात येत आहेत का अशी शंका यावी अशा तऱ्हेने वापरली जातात— अगदी स्त्रियांकडूनसुद्धा.

### स्त्री प्रतिमेचे विकृतीकरण

सर्वच्या सर्व प्रसारमाध्यमांचे तंत्र दिवसेंदिवस विकसित होत आहे–, या माध्यमांचा उपयोग अधिकाधिक लोक करीत आहेत. त्यात स्त्रियांचा हिस्सासुद्धा मोठा आहे. आणि तरीही स्त्रीच्या प्रतिमेचे विकृतीकरण चालूच आहे– नव्हे वाढत आहे.

सर्व प्रसार माध्यमांत सर्व थरांतील लोकांवर प्रभाव पाडणारे माध्यम म्हणजे सिनेमा ! तळागाळातल्यांप्रमाणे सर्व उच्चभ्रू घरांत जाऊन पोचणारा, भरपूर भांडवल असलेला, आणि तंत्रामधे दिवसेंदिवस अधिकाधिक प्रगती करणारा ! तंत्र सुधारतेय खरे परंतु स्त्रीची प्रतिमा? एक तर वेश्या, नाहीतर पतिपरायण– म्हणजच स्त्री पतिपरायण नसेल तर ती छचोर असेल– मधली दुसरी कोणतीच अवस्था तिच्या बाबतीत संभवत नाही.

आश्चर्य म्हणजे– सिनेमाच्या आरंभीच्या काळात ही अवस्था नव्हती. हाणामारीचे चित्रपट पूर्वीही होते– पण– स्त्री– त्यात सेक्स सिम्बॉल नव्हती– स्त्रियांनाही हाणामारीच्या प्रसंगाला अनुरूप असे उपयुक्त शिक्षण घ्यावे लागे. फिअरलेस नादिया त्या काळात प्रसिद्ध होती. दुर्गाबाई खोटे, ललिता पवार या सर्वांना तसे शिक्षण चित्रपटातल्या प्रसंगासाठी आवश्यक म्हणून घ्यावे लागत होते. पण आता ?

### भारतीय संस्कृतीची शोकांतिका

स्त्रीमधल्या सामर्थ्याची प्रचीती देणारा एक चित्रपट–'औरत' –सुधारित आवृत्ती मदर इंडिया निघाला होता. विधवा–अनाथ, सुंदर स्त्री–आपल्या मुलांना– वाढवताना समाजाशी झुंज देते त्याचे ते चित्रीकरण होते. भारतीय समाजाची हीही एक शोकांतिकाच आहे. स्त्रीमधले ओज तिचा पती हयात असताना प्रगट होत नाही. झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर, चांदबिबी ही इतिहासकालीन उदाहरणे काय दाखवतात ?

तर काहीका असेना, स्त्रीच्या ओजस्वितेला स्थान देणारे मदर इंडिया सारखे चित्रपट पूर्वी होते एवढेच नव्हे तर प्रणयासाठी व्याकुळ होऊन जीवावर उदार होणाऱ्या स्त्रीचे 'चित्रण करणारे 'महल' सारखे गूढरम्य चित्रपटही त्या काळात रुचले होते.

आताच्या चित्रपटात स्त्रियांना काही भूमिकाच राहिली नाही. माधुर्य सौंदर्य हासुद्धा सिनेमात काम मिळण्याचा निकष नाही. दिलखेचक अंगविक्षेप येत असणे एवढेच महत्त्वाचे परिमाण ठरले आहे.

परिस्थितीचे इतपत असणे एकवेळ ठीक आहे– परंतु दिवसेंदिवस-स्त्रीला केवळ एक भोगवस्तूच्या स्वरूपात दर्शवले जातेय तर त्याच-वेळी पुरुषांना मात्र अधिकाधिक सामर्थ्यशाली दाखवले जातेय–पुरुष-भूमिकेचे उदात्तीकरण चाललेय असे दिसते.

काला पत्थर 'मधील तिन्ही नायक, शत्रुघ्न सिन्हा, अमिताभ बच्चन, शशीकपूर यांना त्यांचे सामर्थ्य दर्शवणाऱ्या पुरेशा हाणामाऱ्या आहेत, एवढेच काय, अमिताभ बच्चनवर जेव्हा सुरा हल्ला होतो तेव्हा अमिताभ सुरा उडवून लावण्याच्या भानगडीत न पडता सरळ धारेच्या बाजूने पकडतो– आणि हात रक्तबंबाळ होत असताना ज्याच्या हाती मूठ आहे त्याला हरवतो.

–आणि तिन्ही नायिका काय करतात? एका लग्नसमारंभात नीतू सिंग नाचते, राखी पेटी वाजवते, प्रवीन बाबी झांजेचा ताल धरते.

जिंदगी 'मध्ये वृद्ध आई-वडिलांकडची पैशाची ऊब नाहीशी होते तेव्हा दोन्ही कर्त्या मुलांना आई-वडिलांचे ओझे होते. आणि- एकेक ओझे वाटून घ्यायचे म्हणून मुलगे आई-वडलांना वेगळे करतात. आणि आई-वडिलांचा छळ बघवत नाही म्हणून अविवाहित तरुण मुलगी जिचे एका तरुणावर प्रेम आहे–जी कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेते आहे ती मुलगी प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ म्हणून दुसऱ्या एका श्रीमंत तरुणाची मागणी स्वीकारते. तो श्रीमंत तरुण आई–वडिलांची देखभाल करेल म्हणून ! गरीब प्रियकराला ती सरळ नकार देते.

शिक्षणाच्या आधाराने स्वतःच्या हिंमतीवर आई-वडिलांना मदत करण्यापेक्षा, श्रीमंत तरुणाला स्वतःहून विकत जाणे अधिक सोयीचे ! शिक्षण ही लग्नाच्या बाजारात विक्री किंमत वाढवणारी एक वस्तू.

हिंदी चित्रपटच कशाला हवा–वि. वा. शिरवाडकरासारखे सिद्धहस्त लेखकसुद्धा याला अपवाद नाहीत क्रांतीचा जयजयकार करण्याइतके त्यांचे मन तरल आहे. परंतु स्त्रीचे समाजातील स्थान हे जाणत नाहीत.

'नटसम्राट' ही एक त्यांची दर्जेदार कलाकृती. तर नटसम्राट आपल्या पत्नीला म्हणतात–ज्याप्रमाणे साहसी नाविक . दर्यावर दूरदूर साहसे करून येऊन किनाऱ्यावर परततो–कधी परतताना विजयाची धुंदी असते–तर कधी जीवाला विव्हळ करणाऱ्या जखमा ( नाटका-तील भाषा फारच प्रभावी आणि सुंदर आहे ) घेऊन किनाऱ्यावर प्रचंड ओढीने परत येतो. त्या नाविकाप्रमाणेच मी नाट्यक्षेत्रात मुक्त

संचार करून तुझ्याकडे परत येतो–वगैरे–तेव्हा नटसम्राटाची पत्नी हळूच विचारते–मेनकाबाई–आणि तुम्ही–जेव्हा एकत्र होता तेव्हा तुम्ही माझ्याकडे परत आलात–ते कोणत्या अवस्थेत? त्यावेळी नटसम्राट उसासा टाकून म्हणतात–तीही एक जखमच होती–जीवघेणी!

शेवटी 'स्त्रीची' किनाऱ्याची भूमिका जाणार तरी केव्हा. मेनकेच्या नावाने उसासा सोडण्यापेक्षा जर नटसम्राटांनी पत्नीविषयी हळहळ व्यक्त केली असती–की खरेच, घराचा सगळा भार तुझ्यावर टाकून मी जेव्हा माझी साहसयात्रा मनमुराद उपभोगत होतो तेव्हा तुला नाही का कधी वाटले–साहसयात्रेत आपणही सामील व्हावे म्हणून? तेव्हा मी तुला एकाकी सोडत होतो–माझे काही चुकले तर नाही? पण छे! भारतीय पुरुष कधी चुकतच नसतात आणि समजा चुकले तरी परत किनाऱ्याला लागतात हे काय कमी आहे–किनाऱ्याने आपली जागा सोडायची नसतेच. एकाच पुरुषासाठी प्रवाहातील साथीदार आणि किनाऱ्यातील आधार या भूमिका वेगवेगळ्या स्त्रियांनी करणे यात अवघड, अनुचित कोणालाच कसे वाटत नाही?

'म तुलसी तेरे आँगन की', 'हळदी कुंकू' हे सिनेमे त्यातलेच! मध्यंतरी कोणत्या तरी कार्यक्रमाला आम्ही उभयता गेलो होतो तेव्हा एकाने गमतीने म्हटले, तुम्ही दोघेही नवराबायको येथे, म्हणजे घरी कोण? येथून गेल्यावर स्वैंपाक-पाणी वगैरे. मुसलमानात बरे आहे की–चार बायकांची परवानगी, एक घरकामाला, एक नोकरीला, एक सोशल व्हिजिटस्ला...

तेव्हा मी हसत म्हटले, जरा दुसरी कल्पना करून पहा. एका बाईने चार नवरे करायचे–एक आचारी, एक दुकानदार, एक सोशल वर्कर, एक सरकारी ऑफिसर...! छे: विनोद म्हणून सुद्धा हे नको वाटते!

### किनारा उद्ध्वस्त झाला तरी चालेल

तर सांगायची गोष्ट म्हणजे किनाऱ्याची भूमिका पुरुषांकडे आली तर?–तर पुरुषार्थ काय राहिला? एक वेळ स्त्री व पुरुष, पती व पत्नी दोघेही एकाच पातळीवर असतील तर–तर कसेतरी चालवून घेता येईल. पण स्त्री प्रवाहासारखी गतिमान आणि तिला आधार म्हणून पुरुष किनाऱ्यासारखा स्थिर? छे: त्यापेक्षा किनाराच उद्ध्वस्त झालेला काय वाईट?

भारतीय पुरुष म्हणेल, पुढे झेपावण्याची माझी कुवत नसेल तर पत्नीनेही आपले पंख छाटावेत.

'आँधी' तील नायिका जेव्हा बापाच्या दडपणाखाली का होईना; सार्वजनिक जीवनात झेप घेते, तेव्हा तिचा नवरा किनाराच उद्ध्वस्त करतो. सार्वजनिक जीवनात शिरल्यावर स्वत:चे घरच ती हरवून बसते–आणि पब्लिकला मात्र वाटते, की नायकाचे यात काहीच चुकले नाही–किनाऱ्याची भूमिका पुरुषांसाठी नसतेच.

रेडिओ–टी. व्ही. वर काम करणाऱ्या स्त्रियासुद्धा स्त्रीच्या दुय्यम भूमिकेचाच का प्रचार करतात हे कळत नाही.

हरतालकेच्या उपवासाचे महत्त्व रेडिओवरच्या महिला मंडळाच्या कार्यक्रमात सांगितले जाते. रेडिओ–टी व्ही स्टेशनच्या संचालकपदी स्त्रिया असणे दुर्मिळच असणार कारण सर्व श्रेष्ठ स्थानावर स्त्रिया असणे (इंदिरा गांधी सोडून) स्त्रियांनाही पटत नाही–पुरुषांना तर नाहीच–नाही.

पण म्हणून काय, स्त्रियांसाठी कार्यक्रम कोणते द्यायचे हे शिकलेल्या स्त्रियांनासुद्धा कळत नाही का? का कळून ठरवू शकत नाहीत?

स्त्रियांच्यात शिक्षणाचे प्रमाण वाढले, अर्थार्जनासाठी स्त्रिया बाहेर पडल्या, कलाक्षेत्रात चमकू लागल्या. परंतु कुठेही त्यांच्यातल्या दुय्यम भूमिकेचे त्यांचे आणि इतरांचे भान सुटत नाही. विकसित होत जाणाऱ्या प्रसार माध्यमातून स्त्रीची प्रतिमा, व्यक्तिमत्त्व विकसित होणे दूरच– उलट एक मालकीची वस्तू म्हणून तिचे जाहीररीत्या प्रगटीकरण केले जातेय. रेडिओ, टी. व्ही., मोटारगाडी या सर्व वस्तूंच्या जाहिरातीत एखादी सुंदर स्त्री असल्याशिवाय भागत नाही. जणू ती म्हणते, 'बघा, एवढ्या मूल्यवान वस्तू तुमच्या मालकीच्या असतील तर माझ्यासारखी सुंदर स्त्रीसुद्धा तुमच्या मालकीची होईल.'

आता फक्त मतपत्रिकेची पेटी हातात घेऊन एखादी सुंदर स्त्री उभी असणे बाकी आहे. ती म्हणते, 'मतपत्रिका पेटीत घालण्यापूर्वी अमुक चिन्हावर शिक्का मारा–लोकशाही नसली तरी माझ्यासारखी सुंदर स्त्री हाजिर आहे!'

◎ ◎


**प्रगतीच्या निकषावर**

**मृणालिनी देसाई**

रु. १२·००

**साधना प्रकाशन**
४३०–३१ शनवार पेठ, पुणे ३०

**भारतीय नारी**

**साने गुरुजी**

रु. १·००

**साधना प्रकाशन**
४३०–३१ शनवार पेठ, पुणे ३०

# हम तो खुद बेसुध हैं... !

तारा भवाळकर

स्त्रियांची अशी काही वेगळी शक्ती असते काय ? म्हटले तर उत्तर सोपे आहे, म्हटले तर गुंतागुंतीचे आहे.

सोपे अशासाठी की निसर्गानेच तिच्याजवळ एक ठेवा दिला आहे. शक्ती म्हणा हवी तर. पुनर्निर्मितीची ! एका मर्यादेपर्यंत पोषणाचीही. पण ही केवळ शरीरपातळीपुरतीच शक्ती आहे, असे म्हटले तर उत्तर सोपे आहे.

परंतु या नैसर्गिक वेगळेपणामुळेच नेमकी तिच्या मनाची घडणही वेगळी होते का ? त्यामुळे तिची बुद्धीही वेगळी असते का ? ती उच्च श्रेणीची की निम्न श्रेणीची असते हा प्रश्न घटकाभर बाजूला ठेवू.

कीर्ती, श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृती आणि क्षमा या स्त्री-शक्ती आहेत, असे म्हटले जाते. स्त्री-शक्ती म्हणजे केवळ स्त्रियांच्याच जवळ असलेल्या शक्ती का ? या शक्ती पुरुषांजवळ नसतात का ? नसाव्यात का ?

### शब्दांची कसरत

किंवा या शक्ती म्हणून स्त्रियांचे ते गुण असतात का ? विनोबांचे वाक्य असे– " संस्कृतमधे धृति, मेधा, क्षमा, कीर्ती, वाणी, मुक्ती, बुद्धी हे सर्व शब्द स्त्रीलिंगी आहेत. " बोध " शब्द पुल्लिंगी असला तरी तो बुद्धीचाच परिणाम आहे. " ( ' स्त्री-शक्ति '– विनोबा पृ. ११० ) शाब्दिक युक्तिवाद म्हणून हे सगळे आकर्षक असले तरी जैविक प्रजाती ( Sex ) आणि व्याकरणातील लिंगव्यवस्था ( Gender ) यांच्यात कितपत सुसंगती आहे ? व्याकरणात ' कलत्र ' नपुसकलिंगी असते. मराठीतही वापरताना तसेच ठेवले जाते. आणि ' हिजडा ' शब्द व्याकरणात पुल्लिंगी असतो. अशी किती तरी उदाहरणे. वायू पुल्लिंगी आणि ' हवा ' स्त्रीलिंगी ! यावर अधिक काय सांगावे ?–केवळ शब्द व्याकरणात स्त्रीलिंगी आहेत म्हणून ते स्त्रीचेच गुण आहेत. स्त्रीच्याच त्या शक्ती आहेत. हे कसे पटावे ?

प्रकृती हे स्त्रीतत्त्व ! म्हणून या सर्व प्रकृतीच्याच शक्ती असे म्हटले तरी प्रकृतितत्त्व स्त्री–पुरुषांत सर्वत्र समानच आहे असे विनोबाच सांगतात. मग प्रकृतीच्या शक्तीही स्त्री पुरुष सर्वत्र समान नकोत का ? तात्पर्य, केवळ शाब्दिक कसरतींनी प्रश्न सुटणारे नाहीत.

### मानव : संस्कृतिनिर्माता

स्त्री मुळात मादी म्हणून तिच्याकडे जननीचे काम, जन्म देण्याचे काम ओघानेच येते. ती ममता करणारी माता बनावी यासाठीही निसर्गच एका मर्यादेपर्यंत जबाबदारी घेतो. पण माणूस इथेच थांबत नाही. तो संस्कृतीचा निर्माता आहे.

प्रकृतीने दिले ते सोयिस्कर वळणारे उन्नत करून त्याची संस्कृती बनवणे हे माणसाचे माणूसपण ! जननीची माता आणि मातेची मातृशक्ती घडवण्याचे कार्य संस्कृती करते आणि मग तिच्या पोटी वात्सल्यादी भावना व्यापक सहानुभाव फुलतात. गृहकृत्यादी कामे नेमून दिली जातात. सोयीसाठी केलेली ही व्यवस्थाच मग चिरेबंदी होते आणि विकृतीच्या मार्गाला लागते. स्त्रीचे माणूसपण लोपते आणि केवळ ते निर्मितीचे साधन म्हणून राबवले जाते. साधनाचा मालक मग पुरुष होतो. आपल्या सोयीनुसार ते तो राबवतो. पण स्त्री हे सुदैवाने किंवा दुर्दैवाने शरीराबरोबरच मन आणि बुद्धी वागवणारे साधन आहे. त्यामुळे ते निमूटपणे राबवून घेता यावे म्हणून कधी त्या मन–बुद्धीला वाकवून, वळवून कधी मारून, कधी उदात्ततेच्या आवरणाखाली गुलामी पोसून सदैव कह्यात ठेवण्याची धडपड पुरुषाला वर्षानुवर्षे करावी लागली. स्त्रीशक्ती, स्त्री–धर्म, स्त्रीचे शील, स्त्रीची नीती, पावित्र्य इ. इ. साठी कथा–कहाण्या रचल्या. ही युक्ती खूपशी सफल झाली. संस्कृतीच्या नावाखाली स्त्री आपल्या शरीर–मन–बुद्धीचे माणूसपण विसरली.

### स्त्री–शक्ती जागरण म्हणजे काय ?

तिचे हे माणूसपण जागे करणे म्हणजे स्त्रीशक्ती जागी करणे. पण हेही उत्तर पूर्ण नव्हे. माणूसपण जसे स्त्रीमधील जागे व्हावे तसेच पुरुषातीलही व्हावे. जोपर्यंत स्त्रीचे व्यक्तिमत्त्व पुरुषांकडून गौण, दुय्यम गणले जाते; जोवर तिच्याकडे तो आपल्या अपेक्षापूर्तीचे साधन म्हणूनच पाहतो तोवर तिची शक्ती जागी होण्यासाठी अनुकूल आणि निरोगी वातावरणच तयार होणार नाही. जोवर तिच्यावर बलात्कार होतात आणि त्या परिस्थितीत तीही स्वतःला अपराधी समजते तोवर तिच्या विकासाच्या वाटा मोकळ्या आहेत असे म्हणावे तरी कसे

### स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू

आज तर हे प्रश्न फारच गुंतागुंतीचे झाले आहेत. इंग्रजोत्तर काळात एकीकडे स्त्रिविषयक पारंपरिक बंधने मोकळी करण्याचे प्रयत्न झाले. ते काही अंशी यशस्वीही झाले तरी अनेकदा मला असे वाटते की बंधने कोणाच्या प्रयत्नांनी मोकळी झाली हाही आमचा एक गोड भ्रमच आहे. पातिव्रत्याच्या कल्पनेसारखाच एक गोड भ्रम !

स्त्री बंधनमुक्त झाली म्हणजे काय झाले ? बालविवाह बंद झाले, विधवांना पुनर्विवाह कायद्याने मोकळे झाले, घटस्फोटाचे कायदे झाले. याचे काही फायदेही झाले. आणखी काय झाले ? मुली शिकल्या, अर्थार्जन करू लागल्या; त्यांचे पोषाख बदलले. बाकी काय बदलले ? सर्वसामान्य समाजात स्त्रीच्या गौण व्यक्तित्वाच्या कल्पना त्याच आहेत.

स्त्री अर्थार्जन करू लागली म्हणजे आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झालीच नाही. उलट पुरुषाच्या हाती अर्थार्जनाचे एक साधन आले. मिळवती बायको, मिळवती मुलगी म्हणून ! म्हणूनच तिचे शिक्षण–पुस्तकी का होईना, आम्ही स्वीकारले. पण अजूनही स्त्रीच्या शीलाच्या कल्पना स्त्रीच्या मनातही लैंगिकतेभोवतीच घोटाळणाऱ्या आहेत; अजूनही स्त्रीची निंदा नालस्ती, कुचाळकी चारित्र्यहनन करण्यात स्त्रीच-अगदी शिक्षि-

तही उत्साहाने, अगदी क्रूर उत्साहाने भाग घेताना दिसते. हरिभाऊ आपटयांच्या काळाबरोबरच याबाबतही आम्ही अजून आहोत.

नोकरीच्या, कामधंद्याच्या क्षेत्रात आमच्या 'बाई'पणाचा आम्ही किती उपयोग करून घेतो? शहाण्या म्हणवणाऱ्यांच्याही हे लक्षात येत नाही. जी नोकरी आम्ही जाणीवपूर्वक स्वीकारली आहे त्या क्षेत्रात केवळ तीच भूमिका असावी. स्त्री म्हणून सवलतीची अपेक्षा आम्ही कामात करतो, तेव्हाच आमचे गौण व्यक्तिमत्त्व आम्हीच मान्य करतो. हक्क आणि सवलती आम्हाला हव्याच असतील तर त्या क्षेत्रातील सर्वांच्या इतक्याच मागाव्यात. पगार घेताना आम्ही पुरुषांहून कमी घेतो का? मग शिक्षक, डॉक्टर, कारकून इ. क्षेत्रात आपल्या कामात कुचराई का? आपली पात्रता वाढवावी आणि त्याचे फायदे मोजून घ्यावे.

### पोकळ माणसाचा विकास

स्त्रियांच्यासाठी वेगळे शिक्षण ही कल्पनाच दिवसेंदिवस कालबाह्य ठरणारी आहे. खरे म्हणजे आजची एकूणच शिक्षणपद्धती ही केवळ मजकूर भरतीची गरज पुरवणारी, माहिती पुरवणारी आहे. माणूस घडवणारी नाही. माणूसपण फुलवणारी नाही. तशी कुठे सोयच नाही. रूढ परीक्षापद्धतीतून तशी अपेक्षासुद्धा व्यक्त होताना दिसत नाही. एकूणच पोकळ, माणूस घडत राहतो.
समाजपरिवर्तन आणि नवनिर्मितीसाठी केवळ स्त्रियांचे कार्य आणि पुरुषांचे कार्य फारसे वेगळे असू शकत नाही. संयुक्त बळाची, संयुक्त प्रयत्नांची गरज आहे. कारण समाज-परिवर्तनाचे आणि 'माणूस' निर्मितीचे स्वप्न सर्वांचे आहे.

केवळ स्त्रियांच्या प्रयत्नांची हेटाळणी आणि उपेक्षाच होते आणि होईलही. त्याबद्दल पुरुषांना आत्मीयता वाटणे कठीण आहे. प्रयत्न सर्वांचे संयुक्त हवेत.

### शिक्षणाचा ढाचा बदलायला हवा

प्रथम शिक्षणाची उद्दिष्टे निश्चित व्हावीत आणि शिक्षण पद्धती बदलावी. तिचे प्रतिबिंब परीक्षा–पद्धतीत फार तर शिक्षणाच्या कसोटयांच्या अंदाजात म्हणा– दिसणे आवश्यक आहे.
निदान समाजपरिवर्तनाविषयी आस्था असलेल्या स्त्री-पुरुषांनी घरात पालक म्हणून, समाजात एक सामाजिक जबाबदार घटक म्हणून मुलगे आणि मुली यांच्या संस्कारांत फरक करू नये. विशेषतः घरात आणि तेही स्त्रियांनी मुलगे आणि मुलांसाठी वेगवेगळी ट्रीटमेंट देणे टाळावे. शिक्षिकांवर–मग त्या प्राथमिक शाळेतील असोत की विश्वविद्यालयीन स्तरावरच्या–ही जबाबदारी अधिक आहे.

स्त्री ज्या क्षेत्रात काम करत असेल त्यात अधिकाधिक गुणवत्ता संपादण्यातच लक्ष केंद्रित करावे. मुख्य म्हणजे आपल्या 'बाई'-पणाचे भांडवल कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही पातळीवर टाळावे. हे झाले वैयक्तिक पातळीवर. याच विचारांचा प्रसार मोठ्या प्रमाणात सर्वत्र होणे अगत्याचे आहे आणि विचाराबरोबरच आचार होणे त्याहून अगत्याचे आहे. पण आज तरी परंपरा आणि अंधश्रद्धेच्या जोपासनेतच तिच्या शक्ती खर्च होताना दिसतात, हे खरेच आहे. स्त्रीच नव्हे तर एकूण समाजच–अगदी शिक्षित आणि मध्यमवर्गही–रूढी आणि अंधश्रद्धेतच गुरफटतो आहे. त्याच्या मनाचे दुबळेपण आणि फरपट वाढते आहे ही परिस्थिती भयानक आहे. यासाठी एकूणच सामाजिक प्रबोधनाची गरज आहे. त्यासाठी जाणीवपूर्वक सांघिक प्रयत्न–लेखन, चर्चा, व्याख्याने व्हावीतच. त्याहीपेक्षा दैनंदिन जीवनातील व्यवहारातून अधिक डोळसपणा देण्याचे कार्य करता येईल. रेडिओ, टी. व्ही., सिनेमा यांचाही सामूहिक प्रचारसाधने म्हणून उपयोग व्हायला हरकत नाही.
उलट आज अंधश्रद्धा जोपासण्याचेच कार्य जेव्हा चित्रपट व टी. व्ही. करताना दिसतात, तेव्हा अधिक चिंता वाटते.

जागतिक पातळीवर हिंसा आणि विकृती यांना आवर घालण्यासाठी स्त्रीशक्ती विशेषतः मानवमात्रातील मातृशक्ती जागी व्हावी यासाठी एखाद्या मिशनच्या पातळीवर प्रयत्न होणे अगत्याचे आहे. ◎ ◎

## श्रीमती मावशी मंडलिक

श्रीमती सुभद्राबाई मंडलिक यांचे वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले.
परिचित मंडळी त्यांना मावशी म्हणूनच ओळखीत आणि 'माय मरो–मावशी जगो' असे म्हणण्यासारखी त्यांची आपुलकी होती.
डॉ. पु. वा. मंडलिक यांच्या त्या भगिनी आणि डॉक्टरांच्या सर्व सार्वजनिक कामात त्यांचा मोठा वाटा असे. त्यांची कर्तबगारी मात्र बरीचशी गुप्तच राहिली.
डॉक्टर समाजवादी चळवळीतील एक नेते. साने गुरुजींबद्दल त्यांना अनिवार आपुलकी. साने गुरुजींच्या सर्व कार्यांच्या पाठीशी ते समर्थपणे उभे राहिले. राष्ट्र सेवा दल, साने गुरुजी कथामाला, साधना, आन्तर भारती या सर्व चळवळींत डॉक्टरांचा मोठा भाग आणि मावशी डॉक्टरांच्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी होते की नाही ते डोळयांत तेल घालून पहात. डॉक्टर त्यामुळे निर्धास्त असत.
आणीबाणीच्या काळात राजबंदी परिवार सहाय्याचे काम सुरू झाले. डॉक्टरांनी ती जबाबदारी पत्करली. त्यातले धोके सर्वांना ठाऊक होते. पण एखाद्या कार्यालयातून जितक्या नियमितपणे कर्मचाऱ्यांना पगार मिळत असेल त्याहून कितीतरी अगत्याने त्या त्या परिवाराकडे वेळेवर मदत पोचती होई. मावशी त्याबाबत फार दक्ष असत.
भावाभावांतील प्रेमाची उदाहरणे पुष्कळ मिळतात, पण उदात्त बंधु–भगिनी प्रेमाच्या अत्यंत दुर्मिळ उदाहरणात डॉक्टर व मावशी यांचा उल्लेख करावा लागेल.
डॉक्टरांचे ऐंशीव्या वर्षी निधन झाले आणि मावशींच्या जीवनात एक प्रकारची शून्यता व्यापून राहिली. डॉक्टरांच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक ती कामे कर्तव्यभावनेने त्या करीत होत्या, पण पूर्वीचा उल्हास त्यात जाणवत नसे. त्यातच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. डॉ. मंडलिकांचे मित्र डॉ. नाखुदा यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, पण अखेर मावशींची जीवनज्योत मालवली. त्यांची आठवण सेवा दल, कथामाला, आन्तर भारती व समाजवादी चळवळीतले लोक यांना बहुत काळ येत राहील. ◎ ◎

# निखारा फुलायला हवा

नीता शहा

या डिसेंबरात पवनारला एक 'विश्व स्त्री-शक्ती जागरण' संमेलन भरते आहे.

सहज एक गोष्ट आठवली.

काही दिवसांपूर्वी जळगाव रेडिओ स्टेशनवर आमचा एक परिसंवाद ठरवला होता–

'स्त्रिया अजूनही अबला आहेत काय ?'

आम्हाला दोन्ही बाजू मांडायच्या होत्या. त्या अबला आहेत नि त्याचबरोबर सबलाही कशा आहेत? तो रेडिओवरचा रेखीव कार्यक्रम असल्याने त्याला बऱ्याच मर्यादा होत्या. व या न संपणाऱ्या, उत्तर न मान्य होणाऱ्या प्रश्नाचे आम्ही पंधरावीस मिनिटात एक ठराविक असे काहीतरी उत्तर शोधून दिले होते. अजूनही हसू येते, काही काही वेळा हे कार्यक्रम किती कृत्रिम होतात !

### भेदाविषयींच्या कल्पना

सामान्य मानसांनाच अजून आपण जागृत करू शकलो नाही तर स्त्री जातीला पूर्ण जागृत करणे इतक्या लवकर तरी शक्य होणार नाही. त्याला कारणे पुष्कळ आहेत.

बऱ्याचजणांच्या मते स्त्री ही पुरुषापेक्षा खूप भिन्न आहे. तर काहींच्या मते ती सर्वच बाबतीत म्हणजे हुशारी, शारीरिक क्षमता, चपळता, कार्यक्षमता इ. सर्वच बाबतीत ती पुरुषापेक्षा कनिष्ठ आहे. तर उलट काहींच्या मते तिच्यात काही सूक्ष्म शक्ती आहेत. व त्या पुरुषांहून भिन्न व उच्च आहेत. तर काही पुरोगामी विद्वान संशोधकांच्या मते स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये केवळ लिंगभेदाशिवाय कसलाही भेद नाही. जो फरक आज दिसतो तो समाजजीवनातल्या वातावरणामुळे झालेला बदल आहे.

स्त्रियांमध्ये काही शक्ती निश्चित आहेत हे समजून पवनारला सर्वोदयी भगिनी संमेलन भरवणार आहेत.

### स्त्री–कोड्याचा विषय ?

प्राचीन काळापासून स्त्रिया हा चर्चेचा व कोड्याचा विषय आहे. रामायणात कैकयी अशी का वागते ?

तिचे स्वभाव विश्लेषण नुकतेच कुठेतरी वाचले. ती अत्यंत चांगली व विचारी बाई होती. रामाला वनवासाला पाठवण्यात तिचा काही स्वार्थ नव्हता तर तिने त्यामुळे दशरथराजाला, त्या रघुवंश कुळाला व राज्याला वाचवले, वगैरे वगैरे बरेच विश्लेषणही केलय. तूर्त तो आपला विषय नव्हे. रामायणातही कैकयी, सीता, उर्मिला, शूर्पणखा या स्त्रियांवर उलट सुलट चर्चा होत आलेल्या आहेत.

भगवद्गीतेत दहाव्या अध्यायात या विषयी एक महत्त्वाचा श्लोक आहे.

**"मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम्।
कीर्तिः श्रीर्वाक् च नारिणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥"**

श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, 'सर्वांचा नाश करणाराही मीच आहे, त्यांचे भविष्यही मीच आहे नि स्त्रियांमध्ये असलेल्या कीर्ती, श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृती, क्षमा हे गुणही मीच आहे.'

भगवद्गीतेमध्ये देखील व्यासांनी श्रीकृष्णाच्या तोंडून स्त्रियांमधील या सप्तशक्तींचा उल्लेख करवून घेतला आहे. आता या शक्ती खऱ्या की खोट्या; त्यांचे प्रमाण कसे हा प्रश्न विचार करण्याजोगा आहे.

पण आजच्या अगदी नेहमी वावरत असणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भात या सप्तशक्ती पुरेपुर नसल्या तरी काही सुप्त शक्ती जरूर आढळतात असे म्हणावे लागेल. त्या सर्वच मानवांमध्ये असतात. म्हणजे. इथे आत्मिक वगैरे शक्ती गृहीत नसून सामर्थ्य-कपॅसिटी-क्षमता अभिप्रेत आहे. सर्वांमध्ये ही कमी अधिक प्रमाणात असते. परंतु काहीजणांना ती दाखवण्यास वाव मिळतो. ती दाखवण्याची काही युक्ती त्यांच्याजवळ असते. तर काहीजणांजवळ ती क्षमता असून ती ते दाखवू शकत नाहीत. जर एखाद्या मुलीची आणि मुलाची बुद्धिमत्ता, हुशारी सारखी असेल तर मुलाला शक्य असलेली प्रत्येक संधी समाजाकडून, आई-वडिलांकडून दिली जाते. मुलीला मात्र अनेक अडचणींना तोंड देण्यात ती हुशारी, शक्ती संपवावी लागते.

### जाणीव करून देण्याची आवश्यकता

लिंकनने म्हटल्याप्रमाणे प्रत्येक गुलामाला प्रथम आपल्या गुलामगिरीची जाणीव करून द्यावी लागते.

स्त्रियांना खूप उशिरा का होईना पण थोड्या फार प्रमाणात आपल्या गुलामगिरीची, आपल्या कमीपणाची, दुर्लक्षिलेपणाची जाणीव झाली आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी धडपड आता त्या करत आहेत.

याची सुरवात पाश्चात्य देशांत सुरू झाली असली तरी त्याचे कमी अधिक पडसाद भारतीय स्त्रियांवर पडत राहिले. उच्च मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय सुशिक्षित समाजात जरी स्त्रियांचा दर्जा सुधारला असला तरी आपल्या देशातील सामान्य स्त्री व कनिष्ठ स्त्री अजूनही वैदिक धर्माने नेमून दिलेल्या प्रमाणे आपल्या शूद्राच्या दर्जातच मोडत आहे. तिला अजूनही आपल्या अंगभूत सामर्थ्याचा मागमूस नाही. आपणही काही करू शकतो याचा पत्ताच नाही.

गीतेतील ज्या सात शक्ती सांगितलेल्या आहेत त्या सर्वांचा उपयोग ती फक्त आपल्या घरापुरताच करते. नवऱ्याच्या कीर्तीत कीर्ती मानणे, मुलांना वळण लावणे, स्वयंपाक करणे व घरदार सांभाळणे, यातच या सर्व शक्तींचा विनियोग करते.

### स्त्री–शक्ती जागरण

याचा उपयोग इतर संदर्भात होणे शक्य आणि हितावह आहे. माणूस म्हणून तिचा तो अधिकारही आहे याची स्त्रियांना जाणीवही नसते.

या शक्तींची तिला जाणीव करून देणे व त्यासंबंधी तिला जागृत करणे हेच 'स्त्री-शक्ती जागरण' व ती लपलेली शक्ती जागृत

कशी करणार ? ते इतर संदर्भ कोणते, ते कसे लक्षात घ्यावेत याचाही विचार त्यात अनुस्यूत आहे. फक्त टी. व्ही. वर मुलाखती घेऊन, रेडिओवर परिसंवाद घेऊन ही जागृती कधीही शक्य नाही.

खेड्यापाड्यावरील बायका शेतावर व रानात काम करत असतात. अद्याप देशात अशी कित्येक खेडी आहेत की ज्यांना टी. व्ही. ही माहीत नाही. रेडिओ जरी खेडोपाडी पोचला असला तरी शहराप्रमाणे तिथल्या बायका सुपारी चघळत तो ऐकत बसणार नाहीत, हे थोडा विचार केल्यावरही लक्षात येईल. तर खरी जागृती करण्याचे काम या कष्टकरी स्त्रियांकरता आहे. त्यांच्याकरता आपल्याला वेगळ्या साधनांचा विचार करावा लागेल.

### असे करता येईल का

शहरातील काही सुशिक्षित बायकांनी खेड्यात गेले पाहिजे. या बायकांमधीलच एक होऊन तिथे वावरले पाहिजे.

हे प्रयत्न पुरुषही करू शकतील, नाही असे नाही. पण स्त्रियांची बाजू स्त्रिया जेवढ्या जाणतात तेवढे पुरुष समजू शकणार नाहीत.

आजची या सर्व स्त्रियांची शक्ती रूढी, परंपरा जतन करण्यातच खर्च होताना दिसते. नि समाजाने अगदी लहानपणासूनच त्यांच्यावर कंडीशनिंग करून, ठसवून त्यांचे दुय्यम स्थान, तू कशी कनिष्ठ, तू कशी नीच, तू आई-बापांना जड कशी, तू नवऱ्याची दासी कशी हे सर्व पटवून दिलेले असते. तुझी किती कर्तव्ये आहेत ? तू आयुष्यभर चूल आणि मूलच कसे सांभाळले पाहिजे, हे बजावलेले असते.

या सर्वांच्या भाऱ्याखाली दबून ती भीत भीत हे सर्व आपल्या कुवतीप्रमाणे सांभाळण्याच्या प्रयत्नातच अर्धी अधिक संपून जाते.

जर या सर्व रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, पूर्वीच्या तिच्याबद्दलच्या कल्पना व अपेक्षा यांचे स्तोत्र, कौतुक कमी केले तर नक्कीच ती, काही शक्ती समाजपरिवर्तनासाठी खर्च करू शकेल. नि स्त्री होच समाजाचा महत्त्वाचा घटक असेल, समाज चांगल्या दिशेने बदलण्याचे काम तीच करू शकणार आहे. एक गृहिणी सुशिक्षित झाली, शिकली तर ती पूर्ण कुटुंबाला सुशिक्षित करते. उद्याच्या नागरिकांना व्यवस्थित वळण लावू शकते.

### प्रत्येकाचा सहभाग हवा

प्रत्येक नागरिकाने स्त्रीशक्ती उपयोगितेकरता स्वतः व्यक्तिगतरित्या व ज्या संघटना असतील त्यांनी आपल्या संघटनांद्वारा या कार्याला हातभार लावला पाहिजे.

खेड्यापाड्यांवर, आदिवासी समाजामध्ये जास्ती करून जायला हवे, व आपली मते पटवून द्यायला हवीत. आपल्या अन्याया-विरुद्ध, आपल्या अत्याचारांविरुद्ध, या सर्व जुन्या विचारांबद्दल आपणच आवाज उठवला पाहिजे. त्याकरता थोडाफार विरोधही सहन करावा लागेल. पण पुढील पिढीच्या हिता-साठी आज कुणाला तरी त्याग करावाच लागणार आहे.

◎ ◎



# माझी मैत्रीण अनू

साने गुरुजींच्या ऐंशीव्या जन्मदिनापासून सूसन बी अँथनी पारितोषिक देण्याची योजना सुरू होत आहे. अमरावतीला कुष्ठसेवा कार्य करणाऱ्या श्रीमती अनूताई भागवत ह्या पारितोषिकाच्या पहिल्या मानकरी आहेत. त्यांच्या एका सखीने करून दिलेला हा हृद्य परिचय. हा मान मिळाल्याबद्दल अनूताईंचे हार्दिक अभिनंदन. त्यांना असेच मानसन्मान यापुढेही सतत मिळावे ही शुभेच्छा !

## शकुंतला बोरगावकर

कधी कधी जुन्या मैत्रिणी येतात. काही वेळा गप्पा रंगतात, काही वेळा काय बोलायचे ह्याच प्रश्न उभा राहतो. रस्ते बदललेले असतात. अगदी जिवलग मैत्रिणींचे चेहरेही कधी अनोळखी वाटू लागतात. काहीजणी आपली रडगाणी बदसूर, बेसूर आवाजात गातात. भागत नाही, महागाई किती वगैरे वगैरे टाइपची. 'मोटार घेतली आहे आम्ही माहीत आहे का ?' असे एकदा एका मैत्रिणीने ठणकावून विचारले होते. तेव्हा मी तिला म्हटले होते, 'हो पेपरमध्ये पहिल्या पानावरच वाचले होते!' काही मैत्रिणी सुरेख चर्चा करतात. म्हणजे विषय नेहेमीचेच–विद्यार्थी, गृहपाठ पेपर. मी कधी एकटी बसली असले म्हणजे ह्या सगळ्या मैत्रिणींना बोलावते. त्या अशा डोळ्यांसमोर येऊन गप्पा मारू लागतात. त्यांचे बोलणे कानांत घुमू लागते. ह्या मैत्रिणींच्या घोळक्यात मला एक शांत, समईसारखी तेवत असलेली माझी मैत्रीण अनू भागवत दिसते. क्षणभरातच मी मैत्रिणींच्या साऱ्या घोळक्याला विसरून जाते. अनूच्या विलक्षण असाधारण व्यक्तिमत्त्वापुढे नकळतच माझे शिर झुकते.

सुमारे तीस वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. माझी एक छोटीशी गोड मैत्रीण आपल्या तशाच गोड गोड वहिनीला घेऊन आली होती. आपल्या सुंदर वहिनीचा तिला केवढा अभिमान वाटला होता.... त्या तिच्या वहिनीकडे मी टक लावून बघत होते. नवे कोरे चमचमणारे सोने ... पाटल्या, बांगड्यामधून चकाकणारा हिरवागार चुडा ... लग्नाच्या बस्त्यातील साडीचा नवा नवा सुगंध ... केसातील वेणीचा सुगंध ... मला माझ्या मैत्रिणीची ती नवी नवी वहिनी फार आवडली. ती माझ्याशी काय बोलणार ? माझ्याकडे बघून तिने एक तसेच सुगंधी हसू फेकले. मग तर काय आम्ही खूश ! माझी मैत्रीण आपल्या दादाबद्दल आणि ह्या नव्या वहिनीबद्दल नेहमी काही काही सांगायची. तिच्या दादाला लग्नानंतर लगेच काश्मीरच्या आघाडीवर जावे लागले. 'अय्या, म्हणजे लग्नानंतर लगेच लढाईवर !' ही माझी प्रतिक्रिया, पण मैत्रिणीने पुन्हा ठणकावून सांगितले... 'माझी वहिनी, माझ्या दादासारखीच शूर आहे. ती मुळीच घाबरली नाही !' त्या वहिनीबद्दलचा आदर लगेच दुणावला...मैत्रिणीच्या घरी आम्ही सदैव वाहिलेल्या...मधूनमधून माझी ही आवडती वहिनी मला दिसायची...कधी ती महूहून यायची, कधी श्रीनगरहून...! कधी बॅडमिंटनच्या मैत्रिणींसह जाताना दिसायची, कधी छोट्याला घेऊन शॉपिंगला जाताना. माझी ओळख हसण्यापलीकडे फारशी पोचलीच नव्हती ... मैत्रीण आपल्या वहिनीबद्दल बातम्या पुरवायची ... माझा दादा आणि वहिनी इंग्लडला गेले आहेत ! ही त्यातली एक महत्त्वाची बातमी !

दिवस चालले होते. छप्पन साल उजाडले होते. एका सकाळी मी ती बातमी वाचली आणि अक्षरशः माझे हात पाय थरथरूच लागले ! ...माझ्या मैत्रिणीच्या दादाची क्रूर, निर्घृण हत्या झाली होती ... हा माझ्या मैत्रिणीचा दादाच ? का दुसरा कुणी ?... मी तरातरा धावत गेले. दुर्दैवाने बातमी खरी होती ! ... अनूला, तिच्या दोन गोजिरवाण्या सशासारख्या मुलांना पाहून माझे डोळे भरून आले ! ...

पुढे काही दिवसांनी अनू मला म्हणाली, 'शकू, अग विचार करण्यासाठी एक क्षण सुद्धा मिळाला नाही !' अनू आणि तिचे पती, त्यांच्या काही स्नेह्यांना बंगल्याच्या फाटकापर्यंत पोचवून घरी परतत होते तोच अनूच्या पतींच्या खांद्यावर मार बसला आणि त्यांच्या अनूला आणि दोघा बछड्यांना सोडून ते गेले ! ... केवढा जबरदस्त आघात होता. 'शकू, अग, त्यावेळी मी वेडी कशी नाही झाले ह्याचेच मला आश्चर्य वाटते !' अनू मला म्हणाली...

'अनू, देवाला तुझ्याकडून फार मोठे सेवाकार्य करवून घ्यायचे होते. वेड्याला शहाणी करणारी तू !'

आपल्या सुखी, समृद्ध संसारातून अनू अशी फेकली गेली ... पण हे फूल ... कुठे इकडेतिकडे फेकले गेले नाही. दरिद्री नारायणांच्या तपोवनात हे फूल ..विसावले !...अनूचे वडील डॉ. शिवाजीराव पटवर्धन. दाजीसाहेब म्हणून त्यांना सारे ओळखतात. स्वातंत्र्यलढ्यातील ते एक झुंजार नेते. सुभाषबाबूंच्या विश्वासातले. पहिल्या स्वातंत्र्यदिनाची लोक तयारी करीत असताना दाजीसाहेबांच्या मनात विचार आला, 'स्वातंत्र्यानंतरही इंग्रज इथे रहावे असे वाटणारे कोणी अभागी जीव या देशात असतील काय ?' आणि त्यांच्यासमोर महारोगी उभे राहिले. दाजीसाहेबांनी कुष्ठसेवेला वाहून घ्यायचे ठरवले. त्यातून अमरावतीच्या परिसरात जगदंबा कुष्ठनिवास–तपोवन उभे राहिले. दाजीसाहेबांना आता तोच एक ध्यास. आपल्याला उमेदीचे कार्यकर्ते पुरेशा संख्येने मिळत नाहीत, ही त्यांची कायमची चिंता.

अनूला दाजीसाहेबांची ही चिंता अस्वस्थ करी. आपण मुलगा असतो तर हा वारसा चालवला असता, मग मुलगी झाले तर का

चालवू नये? बरोबरीचे हक्क आपण मागतो ना?

आणि एक दिवस पुण्यातले जीवन सोडून अनू तपोवनात जाऊन पोचली देखील. दाजी-साहेब आणि पार्वतीबाई यांना केवढा आनंद झाला!

अनू ही एक उपजत कलाकार आहे. तिची वेदना कुंचल्यापाशी विसावली आहे. स्वतःचे अश्रू पुसायला तिच्या बोटांना उसंत नाही, फुरसत नाही. कारण ती आहेत कलाकाराची बोटे...अनूच्या चित्रकलेने तिला...नवे जीवन दिले आहे...कुष्ठरोग्यांच्या मनाला काही तरी खाद्य लागते...त्या हात पाय झडलेल्या, नाक गळलेल्या रोग्यांचे मन झडता कामा नये. अपंग महारोग्यांचे मन अपंग होता कामा नये ह्या झडलेल्या बोटांतून काही तरी सुंदर निर्माण होते... अनूच्या चित्रकलेला, तिच्या हस्तकौशल्याला इथे नवाच मार्ग दिसला. काही चित्रकारांची चित्रकला अमीरांच्या महालात स्थानापन्न होते. त्यांच्या चित्रांची प्रदर्शने श्रीमंती थाटात भरवली जातात... भारी उंची वस्त्रे परिधान केलेल्या रंगीत बाहुल्या, आपल्या ओठांच्या रंगीत पाकळ्या नाजुकपणे उघडून त्या चित्रांचे कौतुक करतात...हौ नाइस! हौ क्यूट! अनूची चित्रकला ह्या थाटाची नाही. तिच्या कलेत वेदना, अश्रू पुसून काढण्याचे अलौकिक सामर्थ्य आहे. संपूर्ण बोटे झडलेला हात सुंदर रांगोळी काढू शकतो, काही फुले तयार करू शकतो. [illegible] [illegible] काही तरी सुंदर वस्तू करू शकतो. टाकाऊतून काही तरी सुंदर निर्माण करण्याचे अनूचे कर्तृत्व खरेच फार मोठे आहे!

इथे आपण एखादी सुंदर वस्तूही टाकाऊ करून टाकतो. मग टाकाऊ वस्तूंची तर बातच नको! अनूचे हस्तकौशल्य खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. तिच्या डोक्यात असंख्य नवीन नवीन कल्पना फुलत असतात आणि ह्या साऱ्या कल्पना कुष्ठरोग्यांच्या झडलेल्या बोटांना नवा मंत्र, नवे जीवन देतात! कला आनंद देतेच, पण त्यापेक्षा कला, वेदना विसरवून टाकते, व्यथेला पळवून लावते. आणि मग आनंदाचे शीतल चांदणे पसरवते असे म्हणणेच योग्य ठरेल.

अनूताईंनी कुष्ठरोग्यांची नाटके इतक्या चांगल्या रीतीने बसवली की स्पर्धेत त्यांना वरचा क्रमांक मिळाला. यंदाच्या स्पर्धेत जळगाव केंद्राला त्यांच्या नाटकाने पहिला क्रमांक पटकावला.

अनूला साहित्याचीही चांगली जाण आहे. तिचे 'कुसुमादपि' कोमल मन तिच्या लेखनातून जाणवते. आता तिच्या साहित्याचा प्राणबिंदू म्हणजे कुष्ठरोगी. ती त्यांच्याच सुखदुःखात संपूर्ण समरस झाली आहे. त्यांच्या वेदनेचा वेधच तिच्या साहित्याचा, तिच्या चिंतनाचा विषय झाला आहे. कुष्ठरोग्यांच्या समस्येवर नाटके लिही, कथा लिही, कविता कर...अशी तिची साहित्यसेवा चालू आहे. समाजसेवक हा कलाकार असला म्हणजे त्याची सेवाही कलामय होते. ती कला कलेसाठी, जीवनासाठी न राहता केवळ सेवेसाठीच राहते.

अनूच्या चेहेऱ्यावर आठी शोधून काढण्याचा मी खूप प्रयत्न केला. पण छे!...त्या चेहऱ्यावर सदैव शांत प्रसन्न हास्यच मला दिसले आहे. तिच्या आवाजातसुद्धा कुठे कुरकुर, खरखर नाही. तिच्या साऱ्या व्यक्तिमत्त्वातच एक लोभस गोडवा आहे. तीस वर्षांपूर्वी पाहिलेल्या नववधू अनूमधील तोच प्रसन्नपणा आजच्या सेवाव्रती, श्वेतवस्त्रधारी संन्यस्त अनूमधेही आहे! तिची विनोदबुद्धीही जबरदस्त आहे...आंघोळ म्हटली की माझ्या अंगावर काटा यायचा. आंघोळीला सुट्टी देण्याची माझी सवय (आता वयपरत्वे ही सवय बदलली आहे) म्हणजे अनूचा एक [illegible] विषय! एखादे वेळी सकाळीच माझ्याकडे आली की म्हणायची, 'शकू, चल ...तुझी काही आंघोळीची वगैरे भानगड नसतेच! चल चल लवकर!' आचार्य अत्रे म्हणजे माझे परम दैवत. अनू म्हणते... कीर्तनकाराने देवाचे नाव घेतले की सारे श्रोते हात जोडतात. तसेच गप्पांच्या ओघात आचार्य अत्र्यांचे नाव जरी आले तरी शकूचे हात लगेच जोडले जातात!...अनूशी गप्पा मारणे हा माझा एक मोठा आनंद आहे. तिचा सौम्य, प्रसन्न विनोद, नवीन नवीन कल्पना,...तिचा समजूतदारपणा, समतोल विचारसरणी ह्या साऱ्यांचा माझ्या मनावर फार मोठा परिणाम झाला आहे.

---

काही तांत्रिक अडचणींमुळे स्त्री-शक्ती विशेषांकाची पानांची संख्या वाढवता आली नाही. स्त्री-शक्तीविषयीचे विचार मांडणाऱ्या काही लेखांचा समावेश आता पुढील अंकात केला जाईल.

---


**स्त्रिया आणि क्रांती**

**दादा धर्माधिकारी**

**रु. १.००**

**साधना प्रकाशन**

**४३०-३१ शनवार पेठ, पुणे ३०**


---

समाजसेवेच्या व्रताबरोबर अनूने आपली प्रापंचिक कर्तव्ये कधी सोडली नाहीत. तिचे सासूसासरे तिला आपली लाडकी लेकच समजतात. सासरच्या साऱ्या जणांची ती हवी हवीशी वाटणारी 'ममी' आहे. आपल्या दोन मुलांना सुशिक्षण देऊन तिने पित्याचे कर्तव्यही पार पाडले आहे. तिच्या कन्येचा सुस्थळी विवाह होऊन ती आपल्या संसारात रमून गेली आहे. तिचा मुलगा सैन्यात मोठ्या अधिकारावर आहे. अनू आता सासूबाई झाली आहे. आजी झाली आहे. आपल्या वृद्ध मातापित्यांची सेवाही अनू करीत आहे.

अनूचे आगळेपण मला विशेष जाणवते, कारण तिने आपले दुःख, आपली वेदना...दडवून लपवून टाकली. वेदनेचे विष, अगदी हलाहल विष तिने पचवून टाकले. दैवाने सारा पट उधळवून लावला. तिचे सौभाग्य हिरावून नेले, पण त्या दैवाला अनूने शिव्याशाप दिले नाहीत. चटकन आपले अश्रू पुसून ती दुसऱ्यांचेच अश्रू पुसू लागली! स्वतःच्या मनावरचा मोठा आघात बाजूला ठेवून, इतर पीडितांच्या जखमा धुवू लागली. मला वाटते, ज्या दुर्दैवाने अनूचा सोन्याचा संसार उधळवून टाकला ते दुर्दैवच आता खाली मान घालून अनूला म्हणत असेल, 'बाई ग, मी हरलो. तू जिंकलीस!' अनूच्या जीवनाकडे पाहिल्यावर आठवण होते: या देवी सर्वभूतेषु सेवारूपेण संस्थिता, नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नमः – जी देवी सर्व विश्वामध्ये सेवेच्या रूपाने येऊन राहिली आहे तिला नमस्कार असो!

◎ ◎

# स्त्री-शक्ती जागरण, एक दृष्टिकोन

गीता साने

स्त्री-शक्ती जागरणाच्या चळवळीला आचार्य विनोबा भावे यांची प्रेरणा असल्याने, त्यांची स्त्रीविषयक मते व मार्गदर्शन चळवळीला प्रमाण असणे स्वाभाविक आहे.

'स्त्री-पुरुषांत गुण-अभेद असून, गुणांच्या अभिव्यक्तीमधला भेद बहिरुपाधीमुळे होतो ... समाजात स्त्रीला समतेची वागणूक मिळत नाही...हे स्थान स्त्रियांना आत्मोद्धारानेच मिळेल– सर्वोदय मात्र, शांतीसेना व तत्सम इतर राष्ट्रीय कार्य करून आत्मोद्धार साधेल' असे विचार त्यांनी व्यक्त केलेले आहेत. (स्त्री-शक्ती-पुस्तिकेतून)

आचार्य दादा धर्माधिकारी यांनी 'समाज स्त्रीला धनरूप मानतो व स्त्रीही तो दावा मान्य करते, पण स्वतंत्र होण्यासाठी, स्त्रियांनी आपल्याला धनरूप मानणे सोडावे लागेल' असे आग्रहाने सांगितले आहे. (स्त्री-पुरुष सहजीवन)

### स्त्रीशक्ती विमोचन

स्त्रियांच्या उद्धारासाठी, आचार्यद्वयांनी सुचवलेले उपाय वाचताना डोळ्यासमोर साकारणारी मूर्ती उच्चजातीय, सुखवस्तू-निदान [illegible] लाभलेल्या स्त्रीची आहे.

ह्या स्त्रियांची संख्या शेकडा दहा ते पंधरा असून, उरलेल्या पंचाऐंशी ते नव्वद टक्के स्त्रिया ह्या चळवळीत उपेक्षित राहिलेल्या आहेत. आजपर्यंतच्या सर्व भारतीय स्त्री-चळवळीमधील उणीव ह्याही चळवळीत आहे. उलट विकसनशील भारताला संपूर्ण स्त्री-समाजाच्या समंजस सहकाराची आवश्यकता आहे व सामान्य स्त्रियांची अस्मिता जागवणे, त्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ह्यालाच स्त्रीशक्ती विमोचन म्हणता येईल.

स्त्रीची शक्ती, तिची माणुसकी, जागवण्याचा कार्यक्रम खऱ्या अर्थाने हाती घेण्यासाठी, सामान्य स्त्रियांच्या परवशतेची सामाजिक बंधने ओळखून, ती तोडण्याची पावले प्रथम उचलावी लागतील.

भारतीय संविधानाने लिंगभेदातीत समतेचा पुरस्कार केला व अशा समतेला हानिकारक असणारे कायदे रद्द समजावेत, अशी घोषणा केली. हे समतेचे आवश्यक व उपकारक तत्त्व अंमलात आले तर स्त्रियांची परवशता, किंवा धनरूपत्व नष्ट करणे सुलभ होईल. तथापि वरिष्ठ गटातील मूठभर स्त्रिया वगळता, इतर थरांतील स्त्रियांबाबत, हे तत्त्व पुस्तकाच्या पानात अडकून पडलेले आहे.

### धनरूप स्त्रिया आणि कायदा

भारताच्या सामान्य कायद्यांच्या हिशेबी स्त्रिया पूर्वीप्रमाणेच धनरूप आहेत. धनाला अधिकार, जबाबदाऱ्या किंवा कर्तव्ये नसतात; असतो फक्त मालक ! आपल्या कायद्याप्रमाणे प्रत्येक अविवाहित अज्ञान मुलीचा मालक बाप व प्रत्येक विवाहितेचा मालक तिचा नवरा ! स्त्रीचे सज्ञान होण्याचे वयही अठरा आहे व तोवर तिला आपले हित–अहित कळत नाही, असा कायद्याचा दावा आहे.

बाप, नवरा व त्यांचे वारस ह्यांचा स्त्रियांवरचा मालकी हक्क, आपला सामान्य कायदा कधी प्रत्यक्ष तर कधी आडवळणाने पण निरंतर जपतो. कोणत्याही मालकी हक्कात हक्काबद्दल [illegible] भारतीय दंडसंहितेप्रमाणे दंडार्ह अपराध आहे, व हा नियम स्त्रियांवरच्या मालकी हक्कालाही लागू आहे.

स्त्रिया धनरूप ठरल्यावर, इतर मालमत्तेप्रमाणेच, त्यांना पणाला लावणे, गहाण ठेवणे, त्यांची खरेदी–विक्री करणे, अल्पमुदतीसाठी वापरण्यास वा बक्षीस म्हणून देणे, असे विविध मालकी अधिकार खालच्या थरातून पुरुष प्रत्यही वापरतात. ह्या घटनांविरुद्ध दाद मागण्याचे सामर्थ्य किंवा बुद्धी निरक्षर व अकिंचन स्त्रीला नसते.

### मुलीच्या मताची किंमत शून्य

एखाद्या स्त्रीच्या मालकीबद्दल दोन पुरुषांमध्ये भांडण लागले तर मात्र, तिच्या परवशतेची लक्तरे, न्यायालयाच्या वेशीवर येऊन पडतात. न्यायालयात कायद्याचा कीस पडू लागतो; व न्यायालयाच्या निर्णयामधून पुरुषाचे अधिकार सिद्ध होतात. मुलीची खरेदी-विक्री करण्याचा अधिकार, कायद्यात कोठे नमूद झालेला नाही, पण कन्याशुल्क घेणे दंडार्ह नाही, असा निर्णय न्यायालयाने दिल्यावर, पालक, जबर शुल्क घेऊन, मुली, म्हाताऱ्या-कोताऱ्यांना उजागरीने विकू लागतात. मुलगी गहाण टाकल्यास, गहाण देणारा व घेणारा, न्यायालयातून निर्दोष म्हणून सुटल्यावर पालकाचा हाही अधिकार प्रस्थापित होतो. मुलीला समज आलेली असली तरी अठरा वर्षे पूर्ण होईतो, तिच्या मताला किंमत नसते.

दंडसंहितेची ३५४, ३६१, ३६६,३७५ व ४९७ ही काही स्त्रीविषयक कलमे, सर हरिसिंग गौरसारख्या निष्णात कायदेपंडिताच्या टीकेच्या प्रकाशात अभ्यासल्यास, स्त्रियांच्या परवशतेची दोरखंडे किती मजबूत आहेत व स्त्रियांचे हातपाय किती करकचून बांधलेले आहेत, हे प्रत्ययाला येते. ही दोरखंडे तोडण्याचा वेडा प्रयत्न एकादी भावडी स्त्री करते, पण तिच्या मदतीला धावणे धोक्याचे असते. मदत करणारांना त्यांचा कायदेशीर मालक [illegible] निर्दोष म्हणून सुटतीलच ह्याची खात्री नसते. त्यामुळे हे विकतचे श्राद्ध घेणार कोण ?

### न्यायालयेही स्त्रीद्वेष्टी ?

ज्या चिमूटभर केसेस न्यायालयात पोचतात, त्या केसेसमध्येही स्त्रियांना न्याय व सहानुभूती मिळण्यापेक्षा, त्यांचा पाणउताराच बहुधा होतो. उदा. दंडसंहितेच्या ३७५ कलमाप्रमाणे, बलात्काराच्या बीभत्स कृत्याला कडक शिक्षा सांगितलेली आहे, पण प्रत्यक्ष केस चालत असताना न्यायालयात स्त्रियांचे कल्पनातीत धिंडवडे निघतात व 'कायदा तर स्त्री-विरोधी आहेच, पण न्यायालयेही स्त्री-द्वेष्टी आहेत का ?' असा प्रश्न वारंवार पडतो. त्याचे एक ताजे उदाहरण उद्धृत करीत आहे.

तुकाराम विरुद्ध महाराष्ट्र सरकार ह्या बला-

त्काराच्या केसमध्ये (1979(2)S.C.C.143) आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने निर्दोष ठरवून सोडून दिले आहे. केसमधल्या घटना थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

मथुरा, वय १४ ते १६ च्या दरम्यान व तिचा भाऊ ही मजुरीवर पोट भरणारी पोरकी भावंडे. मथुरेने आपल्या मर्जीने नुशी ह्या तरुणाशी लग्न केले. भावाला लग्न नापसंत असल्यामुळे, त्याने 'माझ्या अज्ञान पाल्याला नुशी व त्याचा एक साथीदार, दोघांनी पळवून नेले,' अशी तक्रार स्थानिक पोलिस ठाण्यात नोंदवली. नवीन क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या कलम १६१ (१) प्रमाणे अज्ञान मुलांना व स्त्रियांना चौकशीसाठी पोलिस ठाण्यात बोलावण्याची बंदी आहे. ही तरतूद पायदळी तुडवून, हेड-कॉन्स्टेबल तुकारामाने रात्री साडेदहा वाजता, मथुरेसकट सर्व संबंधितांना ठाण्यात आणले. सर्वांच्या जबान्या घेऊन, व मथुरेशिवाय इतरांना बाहेर काढून, ठाण्याची दारे बंद करून मथुरेवर तो व कॉन्स्टेबल गणपत ह्यांनी बलात्कार केला. चिंतेने व्याकूळ झालेले तिचे नातलग बाहेर तिष्ठत होते, व हळूहळू मजुरांचा जमावही जमत होता. थोड्या वेळाने मथुरा बाहेर आली. तिने केलेली बलात्काराची तक्रार नोंदवून घेण्यासाठीही जमावाचे दडपण कामी यावे लागले.

### कायदा डावलणारे निर्दोष

[illegible] आरोपींचा बचाव असा होता की 'मथुरा आपण होऊनच आम्हाला वश झाली.' मुंबई हायकोर्टाने हा बचाव अमान्य करून आरोपींना शिक्षा दिली व अपील सर्वोच्च न्यायालयात गेले. 'आम्हाला लोक लाच देतात, ती आम्ही घेतली तर आमचा त्यात दोष नव्हे.' नमुन्याचा हा बचाव, सर्वोच्च न्यायालयाला पटून आरोपी सुटून आले व कायद्याच्या तरतुदी डावलून, स्त्रियांना पोलिस ठाण्यात बोलावण्याचा व त्यांच्यावर 'त्या वश झाल्या' म्हणून बलात्कार करण्याचा ताम्रपट पोलिसांना मिळाला.

ह्या निवाड्याने हादरलेल्या दिल्ली व पुणे विद्यापीठाच्या चार विधी-प्राध्यापकांनी सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना अनावृत्त पत्र लिहून, शेकडो निर्दोष स्त्रियांच्या संरक्षणासाठी ह्या केसचा पुनर्विचार करण्याची प्रार्थना अलीकडेच (सप्टेंबर १९७९) केलेली आहे; त्यावर काही हालचाल होईल तर पाहावयाचे. न्यायालयात अजून तरी सामान्य व मुक्या स्त्रिया अशा उपेक्षित आहेत.

देशाचे शास्तेही ह्यापेक्षा वेगळे नाहीत. १९७८ अखेर दक्षिण बिहारमध्ये सावकार-कुळे ह्यांच्या संघर्षात, सावकारांना बरोबर घेऊन, पोलिसांनी अनेक खेड्यांवर मध्यरात्रीच्या अंधारात धाडी घातल्या व लोकांवर जुलूम केले; त्यात घराची दारे फोडून स्त्रियांवर बलात्कार केल्याच्या घटनाही होत्या.

दोन स्त्रियांनी अशा एका घटनेची चौकशी केली. त्यांच्या चौकशीचा रिपोर्ट, पार्लमेंटच्या बारा स्त्री-सदस्यांनी १९७९ एप्रिलमध्ये, त्यावेळचे पंतप्रधान श्री देसाईंना सादर करून, वरील प्रकरणी, मूळ रिपोर्ट लिहिणाऱ्या स्त्रियांच्या सहकार्याने चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केलेली होती. ह्या बारा सदस्यांत डॉ. सुशीला नैय्यरपासून श्री अहल्या रांगणेकरांपर्यंत सर्व पक्षांच्या स्त्रिया होत्या. ह्या मागणीलाही सरकार-दरबारी वाटाण्याच्या अक्षता पद्धतशीर लावण्यात आल्या. उलट काही उच्चपदस्थ अधिकारी, ह्या खेडुत स्त्रिया चार-दोन रुपयांनाही मिळतात, असा निंद्य व खोटा प्रचार करीत आहेत.

कायद्याखेरीज, इतर क्षेत्रांतही स्त्रियांच्या बाबतीत सतत पक्षपात होत असतो. स्त्रिया अगतिकपणे सर्व अन्याय 'अस्तुरीचा जन्म [illegible] नये रघुपती' म्हणून, देवाला हात [illegible], सोसून घेत [illegible] ह्या स्त्रियांना माणुसकीची प्रतिष्ठा मिळवून देऊन, त्यांची अस्मिता जागवता येईल व नव्याने जागणाऱ्या स्त्रियांमध्ये सामाजिक अधिकारांबरोबरच येणाऱ्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव जागवता येईल.

जागृत स्त्रिया, सर्व थरांत निर्भयतेने संचार करू लागल्या तर बहुसंख्य स्त्रियांची वास्तव स्थिती त्यांना अनुभवाने उमजेल व स्त्री-शक्ती-जागरणाच्या प्रान्तात हे त्यांचे पहिले पाऊल म्हणावे लागेल. स्त्री-शक्ती म्हणजे स्त्रीची माणुसकी जागवण्यासाठी, स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला संघटित तोंड देण्याची यंत्रणा उभी केल्यावाचून हे कार्य साधण्याजोगे नाही. आजच्या स्त्री-चळवळींचे हे मर्मस्थान आहे व ही त्यांची जाणीव जागृत न राहिल्यास, त्याच्या यशाची ती मर्यादाही आहे.

◎ ◎

## नका देऊ भीक

नका देऊ
नका देऊ भीक
माझ्या भिकारी बांधवाना
तुमच्या दानागणीक
आम्ही खोल चिखलात
रुतून पडत आहोत
कधीच वर न येण्यासाठी.

मिळणाऱ्या भिकेने
आमचे हातपाय
बांधून टाकले आहेत;
तुमच्या दानानं चकित
होऊन आमचा मेंदू
दगड झाला आहे.

खुर्चीला बळ यावं
म्हणून एखादा पुढारी
उपकाराचं ढोंग करतो.
नी आमच्यावर घोंगडं पांघरतो
त्या उबेत आमच्या
शरीराचं मुटकुळं पडतं
कान डोळे तोंड
आपोआप झाकले जातात.

असाच एक अन्नदान करतो
अनेक दिवसांपैकी
एक दिवस गोडाधोडाचं
'फुल जेवण' मिळतं
लाचार चेहरा आणखी बावळट होतो
उपकाराचा ढेकर देत
आम्ही गरिबीला कवटाळतो
आणखीनच कवटाळतो,

म्हणून म्हणतो
तुमचा हात भीक
देण्यासाठी पुढे करू नका.
तर आमचा हात

तुमच्या हाती धरून
आम्हाला या डबक्यातून
बाहेर काढा
प्रगतीची वाट दाखवा.

—सुमन कोकाटे

# स्त्री-शक्ती – मानवी जीवनाची संजीवनी

## श्यामा केने

स्त्रियांची पुरुषांपेक्षा वेगळी शक्ती असा अर्थ मी घेतला आहे. जीवनचक्रात गर्भधारणा, प्रसूती ह्या गोष्टी शरीराच्या आधारे होतात, म्हणून ही शक्ती वेगळी आहेच. यामुळेच संगोपन आणि संवर्धन या दोन्ही गोष्टी तिला कराव्या लागतात. यामुळे साहजिकच ज्या ठिकाणी ती या जबाबदाऱ्या पार पाडू शकते, ते 'घर' हेच तिचे कार्यक्षेत्र ठरते. शुश्रूषा आणि शिक्षण ह्या क्षेत्रांतही फार मोठ्या प्रमाणात ती काम करते. याचे कारण म्हणजे तिच्या अंगी असलेली 'ऋजुता' आणि 'स्नेह.' या स्नेहामुळेच क्षणोक्षणी ती इतरांचा विचार करू शकते. स्पर्धेच्या जगात पुरुष हा फक्त स्वतःपुरतेच पाहतो.

असे म्हणतात की जिथे वृक्षराजी खूप असते तिथली जमीन धुपून जात नाही, कारण जमिनीत खोल गेलेली पाळेमुळे ती धूप होऊ देत नाहीत. जीवनात स्त्रीच्या मनाची पाळेमुळे अशीच खोल गेलेली असतात आणि जी थोडीशी जीवनमूल्ये टिकून आहेत ती बहुतांशी 'स्त्री' मुळेच आहेत.

स्त्रीशक्ती जागरण म्हणजे नेमके काय ? ती [illegible]

स्थान कोणते ? या तिन्ही प्रश्नांचे उत्तर 'मन' हेच आहे. कोणतीही गोष्ट मनावर घेतल्याशिवाय किंवा मनात आल्याशिवाय होत नसते. कोणत्याही कार्याच्या पाठीमागे मानसिक शक्ती असेल तरच काम होऊ शकते. स्त्रीला आपल्या जबाबदाऱ्या जास्तीत जास्त चांगल्या रीतीने पार पाडणे का आवश्यक आहे; त्याचे दूरवर सुपरिणाम कसे होतील, हेही पटवून देणे आवश्यक आहे. फक्त तीच हे करू शकते, हेही तिला समजावून सांगावे लागेल. ते ती करू शकेल असा आत्मविश्वास तिच्या मनात निर्माण करावा लागेल इतिहास व वर्तमान यामध्ये तिने कोणकोणत्या उज्ज्वल गोष्टी केल्या आहेत त्या सतत तिच्या डोळ्यांसमोर ठेवाव्या लागतील. आज कदाचित 'स्त्री'ने केलेल्या चांगल्या गोष्टी कमी असतील, पण उद्याच्या ज्या जगात आपली मुले राहाणार आहेत, त्यांच्यासाठी अधिक चांगली माणसे, चांगल्या घटना, चांगले वातावरण निर्माण होणे आवश्यक असेल तर ते तिच्याकडूनच होईल. जिजाबाई होती म्हणून शिवाजी झाला. शिवाजी झाला म्हणून हिंदू धर्म राहिला, हिंदुस्थान राहिला. पण या जिजाबाईला, शहाजीला, स्वातंत्र्याच्या सन्मुख व्हायला लावणारी होती उमाबाई–मालोजीराजांची पत्नी शहाजीची मातोश्री. म्हणूनच शिवचरित्र उत्कट देशप्रीती जागृत करते. कठोर कर्तव्य करायलाही प्रेरणा देते.

महापुरुषांना मोठे करणाऱ्या माताच आहेत. मानवतेवर, जीवनावर निःस्वार्थी उत्कट प्रेम करायला, ते कृतीतून व्यक्त करायला त्यांनीच मुलांना शिकवले. जागतिक शांततेच्या संदर्भामध्ये तर असे म्हणता येईल की, 'प्रत्येक व्यक्ती' जेव्हा मानवतेवर प्रेम करेल तेव्हाच युद्धे जगातून हद्दपार होतील.

आपल्यापेक्षा इतरांचे दुःख जेव्हा महत्त्वाचे वाटेल आणि ते दूर केल्याशिवाय पूर्ण मानसिक समाधान मिळणार नाही अशी [illegible] दुःखे कमी होतील. पण त्यासाठी ते आपले जीवनध्येयच बनले पाहिजे. चांगल्या गोष्टी माहिती असतात; पण त्यांचा आणि माझा संबंध काय, आणि त्या मी प्रत्यक्षात आणण्यात माझा स्वतःचा फायदा काय, असे प्रश्न निर्माण होतात. भोवती निर्माण होणारे चांगले वातावरण आणि समोरच्या माणसाचा आनंद हाच खरा फायदा; पण हा फायदाच आहे हे समजण्याची शक्ती पाहिजे. उद्याचे जग सुंदर करण्यासाठी उद्याचे नागरिक मनाने सुंदर करावे लागतील.

आज तरी बहुसंख्य स्त्रियांची शक्ती रूढी, अंधश्रद्धा, परंपरा आणि समाजातील आपले दुय्यम स्थान सांभाळण्यात खर्च होत आहे. समाजपरिवर्तन म्हणजे 'व्यक्ती' प्रमुख न मानता समाजप्रमुख मानून त्याचा सन्मान, उत्थान, संरक्षण, शुचिता या गोष्टींच्याबाबत सतत जागरूक राहाणे. हे व्यक्तीचे कर्तव्य ठरेल. हे समाजसंवर्धन करत असताना आपाततः वाट्याला आलेले सुख, समाधान मानता येणे, होणारा त्रास काढता येणे, समाजात एखादी दुर्घटना घडत असेल तर 'मला काय त्याचे' असे विचार न येता मीही दूरान्वयाने जबाबदार आहे, याची शिक्षा, याचे प्रायश्चित मीही घेतले पाहिजे.

भावनेच्या संदर्भात व्यक्ती या कल्पनेला छेद दिला पाहिजे. कर्तृत्व जास्तीत जास्त मजबूत राष्ट्रबांधणीसाठी खर्च व्हायला हवे. ही कम्युनिस्ट विचारसरणी नव्हे. कम्युनिझममध्ये तुम्हाला या गोष्टी मान्य असो वा नसो त्या कराव्याच लागतात. त्यामुळे त्यातील जिवंतपणाच नाहीसा होतो. समाजपरिवर्तन हे मानसिक परिवर्तनातून आपल्याला घडवायचे आहे. किमान गरजा समाजाने भागवाव्यात आणि व्यक्तिगत विकास संघटनांनी अशा प्रकारे घडवावा, वरील विचारप्रणाली रुजवून आचरून.

[illegible] घेतली जाते. पण मग अपत्यप्राप्तीनंतर तिचे स्वातंत्र्य मान्य होणे आवश्यक आहे. म्हणजे केवळ तिच्या इच्छेने किंवा तिच्या इच्छेविरुद्धही पतीव्यतिरिक्त आणखी कुणाचा संबंध येईल या दडपणाखाली क्षणोक्षणी तिच्यावर दबाव आणण्यापेक्षा तिचे स्वातंत्र्य तिला देणे इष्ट ठरेल. त्यामुळे तिला कार्यक्षेत्र लाभेल. मात्र एक गोष्ट अत्यंत कटाक्षाने इथे लक्षात ठेवली पाहिजे की, पतिपत्नीला परस्परांविषयी वाटणारे आकर्षण हाच सुखी संसाराचा पाया असतो. दोघांपैकी एकाच्याही मनात दुसऱ्या व्यक्तीविषयी ओढ, अभिलाषा निर्माण झाली तरी सारे माधुर्य संपते. तेव्हा या नाजूक नात्याची जपणूक करणे हे सर्वात महत्त्वाचे. ◎ ◎

# अनेकरूपा स्त्री-शक्ती

**कुमुद पावडे**

संपूर्ण भारतभर स्त्रीशक्तीचे आधान चाललेले बघून एक स्त्री ह्या नात्याने अंतर्यामी आनंद वाटल्यावाचून राहत नाही.

हजारो वर्षांपासून भारतीय संस्कृतीनिष्ठ परंपरेने जिला दडपून ठेवलेले आहे, जिचा जन्म ही देखील माणसाच्या पूर्वजन्माचं पाप अशी धारणा केलेली आहे, जिच्या प्रजोत्पादनाच्या निसर्गदत्त शक्तीचा केवळ साधन म्हणून उपयोग करून दाईप्रमाणेच केवळ पोषणाची अधिकारिणी आणि अपत्यांच्या भवितव्याच्या चिंतेची देखील अनधिकारिणी ठरवलेली, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' हे फक्त ग्रंथात जपून ठेवून प्रत्यक्षात मात्र तिला अबला, परावलंबी, पुरुषाश्रित, कवडीच्या आर्थिक व्यवहाराला देखील अपात्र ठरवलेली, पायातल्या पायतणाइतकीच किंमत मानली गेलेली, पायदळी तुडवलेली, दलित ठरवली गेलेली स्त्री वाव मिळताच तथाकथित पुरुषशक्तीशी कोणत्याही क्षेत्रात स्पर्धा करून आपण सबल आहोत हे सिद्ध करू लागलेली आहे.

तिच्या ठिकाणी असलेल्या अनेकरूपा शक्तीने, [illegible] कोणत्याही जागृत स्त्रीनं करावी.

### भेद शक्तीचा नाही

शक्ती म्हणजे बल. व्यक्ती शक्तीशिवाय असू शकत नाही. निसर्गातील समग्र प्राणिजात शक्तीयुक्त आहे. त्यामुळे मानवातील पुरुष व स्त्री दोघेही शक्तीयुक्त आहेत. लिंगभेदामुळे पुरुष व स्त्री ह्यात भेद निश्चितच आहे पण त्यामुळे त्यांच्या शक्तीत फरक नाही.

उलट स्त्रीला निसर्गाने प्रजोत्पादनाची आगळी देणगी दिलेली आहे.

मानवशक्तीचे तीन प्रकार पडतात.

शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक.

### शारीरिक शक्ती

भारतीय संस्कृतीत स्त्रीला अबला म्हटले जाते ते अर्थातच निसर्गनियमाशी विसंगत आहे. शारीरिक बलाच्या बाबतीत निसर्गातील सर्व प्राण्यांच्या माद्या नराइतक्याच ताकदवान आहेत.

जंगली, डोंगराळ भागामध्ये राहणाऱ्या लोकांना वाघापेक्षा वाघिणीचे वा नागापेक्षा नागिणीचे भय अधिक वाटते. मानवाच्या रानटी अवस्थेत देखील ह्याच सत्याचा प्रत्यय येतो. स्त्री पोरांना जन्म देत होती, त्यांचं पोषण करत होती आणि वन्यपशू व इतर मानवप्राण्यांपासून ती पोरांचं समर्थपणे रक्षण करत होती.

पण जसजशी पुरुषप्रधान संस्कृती आकाराला आली तसतशी स्त्री दबली जाऊ लागली, मालकीची वस्तू म्हणून संरक्षणीय ठरली आणि अबला झाली. स्वरक्षणासाठी धडपड करणाऱ्या स्त्रीला हलक्या प्रतीची स्त्री म्हणून पुरुषसमाजाने नावे ठेवली. परिणाम असा झाला की स्वरक्षणासाठी शारीरिक शक्ती उपयोगात आणण्याची निसर्गदत्त शक्तीच कृत्रिम सामाजिक बंधनाच्या बांधिलकीमुळे स्त्री विसरली.

खरोखरच स्त्री अबला आहे का? आजही [illegible]

सुखवस्तू पांढरपेशा शहरी स्त्रिया नाजूक आहेत, असे कोणी म्हणेल. पांढरपेशे सुखवस्तू पुरुषदेखील नाजूक व कमी ताकदीचे असतात.

कष्टकरी स्त्रीनं जर मनात आणलं तर नाजूक सुखवस्तू पुरुषाला सहज ती शक्तीत हारवते. शक्तिहीनता सर्वच स्त्रियांमध्ये दिसायला हवी होती पण अर्धभागापेक्षाही अल्प प्रमाण असलेल्या स्त्रीवर्गाला लागणारा अबलत्वाचा दुर्गुण नियम होऊ शकत नाही, उलट अल्पसंख्य अबला गट नियमाला-शक्तीयुक्त अपवाद आहेत असं समजू या. त्यामुळे स्त्री शारीरिक शक्तीत हीन आहे हाच गैरसमज दूर व्हायला हवा. गिर्यारोहकांच्या, खेळांच्या स्पर्धांमध्ये स्त्री मागे कोठे आहे?

बौद्धिक शक्तीच्या बाबतीत सांगायचं तर संधी मिळताच पुरुषानी ज्यांचा अतिशय दिमाख मिरवला त्या सर्व बौद्धिक क्षेत्रांत स्त्रीनं पुरुषांबरोबरीचं प्रावीण्य सिद्ध केलेलं आपण बघतो.

शिक्षणक्षेत्रात मुलांपेक्षा मुली गुणवत्तेच्या बाबतीत आघाडीवर आहेत असे दिसते. मग ते विज्ञान असो, कला वा वाणिज्य, कृषी, पशुवैद्यकशास्त्र, शिल्प व वास्तुशास्त्र!

राजकारणासारखं अत्यंत डावपेचाचं क्षेत्र देखील स्त्रियांनी कुशलपणे हाताळलेले आहे ह्याच्या इतिहासाने नोंदी घेतलेल्या आहेत.

### मानसिक सामर्थ्य

मानसिक सामर्थ्याच्या बाबतीत मात्र स्त्री ठिसूळ दिसते. अभावानेच क्रूर वा कठोर आढळते ह्याचं कारण तिच्या मातृत्वशक्तीलाच पुरुषप्रधान संस्कृतीनं सारखं आवाहन केल्यामुळे तिची सहानुभूती, प्रेम, ममता ह्या भावनांनाच वर उचलल्यामुळे ती मनानं काहीशी कमजोर झाली. कारण अपत्यसंरक्षणाची तिची मूळ शक्ती पुरुषांनी तिच्यापासून हिरावून घेतली. ती पाशवी शक्ती [illegible] शक्तीच्या बाबतीत तो दुर्बल बनली.

चांगले चांगले बलदंड पहेलवानदेखील मानसिक शक्तीने इतके कमजोर असतात (मनाने हळवे असतात!) की लहानसा मानसिक आघात झाला की ते खचतात, जीवनातून उठतात.

स्त्रीच्या सर्वंकष शक्तीचा पुरुषप्रधान संस्कृतीला अदमास होता आणि त्यामुळे तिच्या मानसिक शक्तीला एकदाचे कमजोर करून तीव्र आपल्या स्वामित्वाचे संस्कार रुजवले तर ती कायमची बांधील होणार होती हे न कळण्याइतका पुरुषसमाज मूर्ख नव्हताच. झालेही तसेच. शारीरिक, बौद्धिक शक्तीचा आत्मविश्वास असून देखील मानसिक गुलामगिरी अजूनही आपला फार प्रभाव राखून आहे असे दिसून येते.

स्त्रीशक्तीसंबंधी अनेक लेखकांचे वाचन केल्यावर एक गोष्ट निदर्शनास येते की महात्मा गांधींसारख्या स्त्रीकैवारी विचारवंतांचा रोख देखील गीतेच्याकडेच दिसतो. 'गांधी विचारदर्शन-स्त्रीजीवन' ह्या पुस्तकातील 'स्त्रीचे गुणविशेष' ह्या प्रकरणात एक परिच्छेदच 'कीर्तीश्रीर्वाक्चनारीणां स्मृति मेधा धृतिः क्षमा' या श्लोकावरले भाष्य आहे की काय वाटू लागते.

ह्या श्लोकात आलेले शब्द गुणदर्शक स्त्रीलिंगी भाववाचक नामे आहेत. गांधीजींनी हे विशेषत्वाने स्त्रीगुण आहेत असा जो सूर काढलेला आहे तसे नाही कारण प्रस्तुत गुण पुरुषात नसतात का? स्त्रियांपेक्षा पुरुषच जास्त कीर्तीमंत वाक्पटू म्हणून गाजलेले आहेत. स्त्रीयांमध्ये हे गुण आहेत पण अजूनही म्हणावे तसे प्रचारात नाहीत.

लोकमान्य टिळकांनी गीतारहस्यात दक्षप्रजापतीच्या दहा कन्यांपैकी ५ जणींचा उल्लेख केलेला आहे. वाक् व क्षमा सोडून. आणि दहा कन्यांनी धर्माशी विवाह केला असे महाभारतात वर्णिलेले आहे, असे म्हटलेले आहे. खरे तर हे एक रूपक आहे. धर्मावरोबर ह्या गुणांचे सातत्य असणे आवश्यक असते. म. गांधींनी स्त्रीशक्तीचे पाशवी व नैतिक असा विभाग करून या गुणांना नैतिक विभागात समाविष्ट केलेले आहे. [illegible]

[illegible]

खरे तर शक्ती म्हणजे गुण नव्हे. शक्तीचा वापर करणाऱ्या व्यक्तीच्या हाताळण्यात त्या शक्तीचे गुण किंवा दुर्गुण ठरत असतात. विद्युत् एक शक्ती आहे. जीवन उज्वल करणे व जीवन उद्ध्वस्त करणे हे तिचे अनुक्रमे गुण व दुर्गुण विद्युत हाताळणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून नाहीत काय? कीर्ती, श्री असल्या गुणांवर भर देणारा श्रीकृष्ण पुरुषसंस्कृतीचा पुरस्कर्ता आहे हे विसरून चालणार नाही.

स्त्रीच्या मानसिक संस्कारासाठी ह्या गुणांची जुळणी झालेली आहे. तिला मानवी हक्कांपासून वंचित करून देवत्वाकडे नेण्याचा प्रयत्न ही भला करते. स्त्रीच्या कीर्ती, श्री इत्यादी गुणांचा प्रभाव जर भगवंतावर अंतर्बाह्य पडला असता तर ९ व्या अध्यायातील ३२ व्या श्लोकात मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपिस्युः पापयोनयः। स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्॥ असे म्हटले नसते. स्त्रियांची गणना पापयोनिमध्ये करताना तिला पहिल्या क्रमांकावर ठेवलेले आहे. गीतेच्या प्रारंभीच मुळी 'स्त्रिया नरक निर्माण करतात' ही अर्जुनाची गल्लत धारणा जीव कुरतडून टाकते.

**अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः**
**स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः॥**

अधर्म वाढला की कुलस्त्रिया बिघडतात आणि त्या बिघडल्या की, वर्णसंकर होतो व **'संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्यच'** संकर नरकाचे कारण बनतो. नरक निर्माण करण्याचा सारा दोष स्त्रियांच्या माथी मारण्यात आलेला आहे. संकराची अर्जुनाची कल्पनाच काय आहे कळत नाही. संकराच्या प्रचलित कल्पनेची मर्यादा लक्षात घेता 'संकर' हा अर्जुनाच्या वंशात पूर्वापार चालत आलेला आहे पण तो पुरुषनिर्मित धर्मकल्पनेनुसार आहे किंवा पुरुषसंमत तरी आहे त्यामुळे अंबिका अंबालिका काय किंवा त्यांची सासू सत्यवती काय किंवा प्रत्यक्ष कुन्ती व माद्री काय ह्या कुलस्त्रिया अर्जुनाला प्रदूषित वाटत नाहीत. ज्या स्त्री-निर्मित [illegible] कवटाळून आक्रोश करत होत्या. त्या बिघडल्याचा उल्लेख महाभारतात दिसत नाही.

### स्त्री विनाश मार्गाकडे केव्हा वळते?

स्वतःच्या अस्तित्वाला धोका पोहोचतोय हे जेव्हा तिला दिसू लागतं, तिच्या अब्रूवर जेव्हा घाला पडतो, तिचं जीवन उद्ध्वस्त होतं, तिच्या प्रिय माणसांवर आघात होतांना बघते किंवा डोळ्यादेखत तिची पोरं ठार केली जातात तेव्हा गांधीजी म्हणतात ती "पाशवी शक्ती" तिच्याच संचारते. ती हिंस्र बनते.

आजकाल तर सामूहिक स्त्री-शक्तीदेखील अपमानाच्या धगीने पेटून निघून विनाशमार्ग पत्करताना दिसते. नुकताच घडलेला प्रसंग वाचून विनाशमार्ग योग्य की अयोग्य हयाचा निर्णय वाचकांनीच घ्यावा.

५ ऑक्टोबर १९७९ चा दिवस. नागपूरातील भानखेडा येथील दलितवस्तीत महिलामंडळाचे उद्घाटन करायला गेले. ही वस्ती बव्हंशी कष्टकरी, तरी दारिद्र्य सर्वत्र दिसतेय. सौजन्य व सद्गुणावरील विश्वास अजीवात उडालेला, हाणामारी शिवाय जगता येणे अशक्य अशी धारणा बनलेली.

मी बोलण्याचं धारिष्ट्य करतेय. महिलांना जबाबदार धरते मी.

'दारूची दुकानं बंद केली पाहिजेत. गुंडगिरीला तुम्हाला आळा घालता आला पाहिजे. संघटित व्हा, निदर्शनं करा.'

### पोलिसांकडे देत नाही

भाषणानंतर महिलामंडळाच्या कार्यकर्त्या मला सांगतात: आमच्या महिलामंडळाची निर्मितीच ह्यातून झाली. येथे २-३ दारूची दुकानं होती. त्यातलं. एक ह्या संपूर्ण भागात कुविख्यात असलेल्या एका भयानक दादाचं होतं. त्याचे कितीतरी गुंड साथी दिवसाढवळ्या वस्तीत हैदोस घालत. कोणाचीही सून, लेक सुरक्षित राहिलेली नव्हती. अनेकदा सुरे परजत. घरातल्या दोन–तीन माणसांचे [illegible]

एक दिवस ते तरूण मुलींची वाट अडवताना दिसल्याबरोबर आम्ही सर्वजणी फुंकण्या, लाटणी, जळती लाकडं, दगड, जे मिळेल ते घेऊन धावलो. यथास्थित बडवलं, मरेस्तोवर. पाया पडू लागले!

त्यांना आम्ही सांगितलं, 'आम्ही तुम्हाला पोलिसांना देणार नाही. पोलिस हप्ते घेतात व तुम्हाला सोडून देतात. खरंच, अहिंसक, निदर्शनांचा काय प्रभाव पडणार होता इथे?

स्त्रियांमधे योग्य जाणिवा निर्माण करून त्यांच्यातील विविध शक्तींना जागवण्याचा एकच उपाय मला दिसतो—स्त्रियांची मानसिक शक्ती प्रबल करणे.

कारण स्त्रियांमध्ये असलेल्या शारीरिक, बौद्धिक व आत्मिक शक्तीचे देखील अधिष्ठान मानसिक शक्ती आहे.

स्त्रीची मानसिक शक्ती प्रबळ झाली तर विश्वासमोरच्या गहन समस्या सहज सुटू शकतील या सत्याचे प्रत्यंतर येईल. ◎ ◎